



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १९२ * नांदेड * सोमवार, दि. २० जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर वाढणार!

## घाटमाथ्यासह मराठवाडा विदर्भात हायअलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)** – गेल्या दीड महिन्यापासून महाराष्ट्रात पाऊस सरासरीच्या तुलनेत कमी झाला असला तरी आता घाट-माथ्यासह राज्यभरात पावसाचा जोर वाढणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली अनुकूल परिस्थिती आणि हवेतील वाढलेल्या आर्द्रतेमुळे पावसाचा जोर वाढणार आहे. गेल्या वीस दिवसांच्या विश्रांतीनंतर घाटमाथासह मराठवाडा, विदर्भातही पावसाला अनुकूल परिस्थिती तयार झाली आहे. त्यामुळे खरीप पिकांची पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात, चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय आहे. तसेच अरबी समुद्रात वाऱ्याचा वेग वाढला असून, महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात पुढील दोन दिवस विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भ, मराठवाड्यात सध्या पावसाचे अलर्ट देण्यात आले असून, पुणे घाटमाथ्यावरही जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला.

राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. शनिवारी मुंबईसह मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला होता. आजही बहुतांश भागांमध्ये पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. रविवार, १९ जुलै पुणे, अहिल्यानगर यासह बीड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांना पावसाचे येलो अलर्ट देण्यात आले आहेत. बहुतांश विदर्भात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला. वाशिम, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यालाही येलो अलर्ट देण्यात आला आहे.

## राजौरी-पूंछमध्ये ढगफुटी; १० जणांचा मृत्यू

**श्रीनगर (वृत्तसंस्था)** – जम्मू-काश्मीरच्या राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांत मुसळधार पावसामुळे अनेक भागांत मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेला पूर आणि भूस्खलनामुळे काही लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. हवामान विभागाने या भागात आणखी मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्येही मुसळधार पाऊस सुरू असून, नद्यांना पूर आला आहे. तसेच दरड कोसळण्याचा धोका वाढला आहे. १० जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण बेपत्ता आहेत. स्थानिक प्रशासन मदत आणि बचावकार्य करत आहे.

जम्मू-काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात रात्रभर झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि डोंगराळ भागात ढगफुटी झाल्याने अचानक पूर आला. दारहाली नदीने आपल्या किनाऱ्याची संरक्षक भिंत कोसळल्यामुळे बस स्थानकासह आसपासच्या परिसरात पाणी शिरलं. रस्त्यावर उभी असलेली शेकडो वाहनं पाण्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेली. बेला कॉलनीसारख्या सखल भागात पाणी साचलं असून, रस्ते जलमय झाले आहेत.

## जपान ओपन जिंकणारी पी. व्ही. सिंधू ठरली पहिली भारतीय महिला

**मुंबई (प्रतिनिधी)** –भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू हिने जपान ओपन सुपर ७५० स्पर्धेत अफलातून कामगिरी करत इतिहास रचला आहे. अंतिम फेरीत तिने जपानच्या आणि माजी विश्वविजेत्या अकेन यामागुचीवर मिळवलेल्या धडाकेबाज विजयामुळे सिंधूच्या कारकिर्दीचे जणू दुसरे पुनरागमन झाले आहे. तिने आपली संपूर्ण ताकद आणि आक्रमकता पणाला लावून आपल्या या कट्टर प्रतिस्पर्ध्याचा २१-१७, २१-१७ अशा अंकांनी पराभव केला आणि 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले आहे.

पी. व्ही. सिंधू हिने आपल्या या देदीप्यमान कामगिरीने देशासह क्रीडाविश्वात मोठा आनंदाचं वातावरण आहे. तर या देदीप्यमान कामगिरीने तिच्या कारकिर्दीतील सर्वात महत्वाचा विजय मिळवला असल्याचे बोललं जात आहे. विशेष बाब म्हणजे या विजयासह सिंधू जपान ओपनचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.



दरम्यान, पी.व्ही. सिंधूला तिच्या या पूर्वीच्या खेळात कट्टर प्रतिस्पर्धी समजल्या जाणाऱ्या अकाने यामागुने अनेकदा विजेतेपदांपासून (आशियाई चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीसह) वंचित ठेवले आहे. ज्याची सल सिंधूच्या मनात कायम दिसून आली आहे. अशातच रविवारी, ३१ व्या वर्षी, यामागुचीवर मिळवलेल्या धडाकेबाज विजयामुळे सिंधूच्या कारकिर्दीचे जणू दुसरे पुनरागमन झाले. तिने आपली संपूर्ण ताकद आणि आक्रमकता पणाला लावून 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले आहे. तर जपानमध्ये एखादे मोठे विजेतेपद जिंकणारी सिंधू पहिली भारतीय खेळाडू ठरली. टोकियो ऑलिम्पिक २०२१ मधील उपांत्यपूर्व फेरीतील विजयाची पुनरावृत्ती करत तिने आपल्या कारकिर्दीच्या '३.०' टप्प्यातील यशाची नांदी केली.

दरम्यान, यामागुचीने यापूर्वी उंच 'टॉसेस' (शटल कॉक उंचावरून मारणे) आणि सातत्यपूर्ण खेळाच्या जोरावर सिंधूला अनेकदा अडचणीत आणले होते. मात्र, रविवारी सिंधूने यामागुचीचा तो खंबीर प्रतिकार मोडून काढला, ज्याने तिला अनेकदा रोखले होते, आणि गेल्या काही वर्षांत ज्याची उणीव भासत होती, असा एक अत्यंत वर्चस्वपूर्ण विजय तिने नोंदवला. या कामगिरीमुळे ऑलिम्पिकमध्ये महिला एकेरीत भारताकडून प्रबळ दावेदारीची अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. तर हा विजय अन्य कारणांसाठी देशील महत्त्वपूर्ण आहे. कारण हे तिचे पहिले सुपर ७५० विजेतेपद आहे. ज्यामुळे ती ही स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय ठरली आहे. सिंधूने यापूर्वी २०२४ मध्ये सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेत विजेतेपद पटकावले होते. २०१९ मध्ये जागतिक चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर जपान ओपनमधील हा विजय तिचा सर्वात मोठा विजय आहे.

## जॉर्डनमध्ये २ अमेरिकी सैनिकांचा मृत्यू; हल्ले थांबले नाही तर विनाश -इराण

**तेहरान/ वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)** – अमेरिका आणि इराणमधील युद्धाचा भडका आता होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडून पुन्हा एकदा संपूर्ण पश्चिम आशियात पसरत चालला आहे. इराणने शनिवारी चार देशांना लक्ष्य केले असून सुमारे चार महिन्यांनंतर सौदी अरेबियातील अमेरिकन लष्करी तळावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. जॉर्डनच्या अज्रक एअरबेसवर झालेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यात अमेरिकेचे दोन सैनिक ठार झाले आहेत.

या हल्ल्यात एक सैनिक बेपत्ता असून, चौघे जखमी आहेत. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सने दावा केला आहे की, अज्रक येथील विमानांचे हँगर्स आणि पार्किंग क्षेत्रावर झालेल्या हल्ल्यात दोन फायटर जेटसह पाच अमेरिकन विमाने उद्ध्वस्त झाली. दरम्यान, जॉर्डनने इराणची १० क्षेपणास्त्रे आणि इराकने इरबिलवर हल्ला करणारे ड्रोन पाडल्याचा दावा केला आहे. इराणने पुन्हा कुवेतच्या वॉटर प्लांट आणि ऑईल डेपोवर हल्ला केला आहे. इराणचे सर्वोच्च नेते मुज्तबा खामेनी यांनी शनिवारी उशिरा रात्री इशारा दिला की, जर अमेरिकेचे हल्ले थांबले नाहीत तर चोख प्रत्युत्तर दिले जाईल आणि मोठा विनाश होईल.

अमेरिकेने सातव्या रात्री इराणवर हल्ले केले. सेंट्रल कमांडनुसार, देखरेख केंद्रे, भूमिगत शस्त्र साठे व सागरी युद्ध क्षमतेशी संबंधित ठिकाणांना लक्ष्य केले.

## जगभरात मेटासह फेसबुकची सेवा ठप्प!

**मुंबई (प्रतिनिधी)** –जगातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या फेसबुकची सेवा आज म्हणजेच रविवार १९ जुलै रोजी अचानक विस्कळीत झाल्याने जगभरातील लाखो वापरकर्त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे. अनेकांना फेसबुकवर लॉगिन करता आले नाही, तर काहींना वेबसाइट आणि मोबाईल अॅप उघडण्यात अडथळे आले. न्यूज फीड अपडेट न होणे, पोस्ट लोड न होणे आणि पेजेस उघडण्यास विलंब होणे अशा विविध तक्रारी मोठ्या प्रमाणावर समोर आल्या.

वापरकर्त्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. काहींना फेसबुक खात्यात लॉगिन करता येत नाही, तर काहींचे न्यूज फीड रिफ्रेश होत नाही. अनेकांना वेबसाइट उघडण्यासाठी बराच वेळ लागत असून, काहींच्या बाबतीत फेसबुक पूर्णपणे बंद असल्याचे दिसून आले आहे.

## नीट पेपरफुटीप्रकरणी केमिस्ट्री प्राध्यापकाचा शोध सुरू

### लातूरमध्ये सलग दुसऱ्या दिवशी सीबीआयचा मुक्काम

**लातूर (प्रतिनिधी)** –नीट पेपर लीक प्रकरणाच्या तपासासाठी लातूरमध्ये दाखल झालेले केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक सलग दुसऱ्या दिवशीही शहरात ठाण मांडून आहे. या हायप्रोफाईल प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती आणि गांभीर्य लक्षात घेता, सीबीआयने लातूर येथील शासकीय विश्रामगृहात आपले तात्पुरते कार्यालय उभारले आहे. या तात्पुरत्या मुख्यालयातूनच आता तपासाची सर्व सूत्रे वेगाने हलवली जात आहेत, ज्यामुळे लातूरच्या कोचिंग विश्वात प्रचंड खळबळ उडाली आहे.

या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी असलेले नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे पॅनेल सदस्य आणि सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी, 'आरसीसी' क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर आणि डॉ. मनोज शिरूरे यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सीबीआयने आता आपला मोर्चा आर्थिक व्यवहारांकडे वळवला आहे. फुटलेल्या पेपरच्या खरेदी-विक्रीमागे नेमकी कोणती मोठी आर्थिक साखळी सक्रिय होती, याचा कसून शोध घेतला जात आहे

सीबीआयच्या तपासात आतापर्यंत अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी नीट परीक्षेचा केमिस्ट्रीचा पेपर मिळवण्यासाठी पी. व्ही. कुलकर्णी यांना तब्बल ५ लाख रुपये दिल्याचे सीबीआयने न्यायालयात स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर, आणखी किती विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून लाखो रुपयांची गोळाबेरीज करण्यात आली होती, तसेच ही आर्थिक देवाणघेवाण रोख स्वरूपात झाली की बँक खात्यांद्वारे, याचा मागोवा घेण्यासाठी सीबीआयने अनेक संशयितांची झाडाझडती सुरू केली आहे

सलग दुसऱ्या दिवशी सुरू असलेल्या या तपासादरम्यान एक अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सीबीआयचे पथक आज लातूरमधील केमिस्ट्री विषयाच्या एका नवीन प्राध्यापकाचा कसून शोध घेत आहे. या नवीन प्राध्यापकाचा पेपरफुटीच्या रॅकेटमध्ये किंवा प्रश्नपत्रिका वितरणात काही सहभाग होता का? या दृष्टीने संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, हा प्राध्यापक नेमका कोण आहे आणि सीबीआय त्याचा शोध का घेत आहे, याबाबत कमालीची गोपनीयता बाळगण्यात आली आहे. पेपर लीक प्रकरणाचे धागेदोरे शोधण्यासाठी सीबीआयचा हा तपास आता अत्यंत निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे.

## रोहित आणि विराटने रचला इतिहास

**लंडन (वृत्तसंस्था)** –भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना सध्या लंडनच्या लॉर्ड्सवर सुरू आहे. या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. रोहित आणि विराट ही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४०० सामने खेळणारी पहिली भारतीय जोडी ठरली आहे. त्यांनी एकत्र ३९९ आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांचा आधीचा विक्रम मोडला आहे.

जागतिक स्तरावर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळण्याचा विक्रम श्रीलंकाच्या कुमार संगकारा आणि महेला जयवर्धने यांच्या नावावर आहे. या जोडीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५५० सामने खेळले आहेत. त्यानंतर तिलकरत्ने दिलशान आणि महेला जयवर्धने यांचा नंबर आहे. या जोडीने सोबत ४२६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. रोहित आणि विराटने या ऐतिहासिक यादीत आपल्या नावाची नोंद केली आहे.

## नांदेडचे गळके रेल्वे स्टेशन; शेडमधून पावसाच्या धारा, प्लॅटफॉर्मवर पाणीच पाणी!

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरात रविवार, दि. १९ जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास अचानक आलेल्या जोरदार पावसामुळे येथील हुजूर साहिब रेल्वे स्थानकावर एकच गोंधळ उडाला. तो म्हणजे प्लॅट क्रमांक १ च्या टीन पत्र्याच्या छतातून पावसाच्या धारा लागल्या. एखादा पाण्याचा फवारा उडावा असे पावसाचे पाणी प्लॅट फार्मवर पडत होते. यावेळी प्रवाशांची चांगलीच तारांबळ झाली असून, रेल्वे प्रशासनाची धावपळ झाली आहे.

रविवार, दि. १९ जुलै रोजी दुपारपासून सुरू झालेल्या पावसामुळे नांदेड रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्र. १ च्या छतावरून मोठ्या प्रमाणात पाणी गळू लागले. तिकीट खिडक्या, प्रतीक्षालय आणि फूटओव्हर ब्रिजच्या ठिकाणीही पाण्याचे थेंब पडत होते. अनेक ठिकाणी पाणी साचल्याने प्रवाशांना ये-जा करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागला.

पावसापासून बचावासाठी प्रवाशांनी प्लॅटफॉर्मच्या एका कोपऱ्यात गर्दी केली. काही प्रवाशांचे सामानही ओले झाले. रेल्वे स्थानकातील दुकानदारांनाही आपले साहित्य वाचवण्यासाठी धावपळ करावी लागली. घटना कळताच रेल्वे प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पाणी गळती होणाऱ्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात प्लास्टिक शीट व टार्पोलिन लावण्यात आले. तसेच प्लॅटफॉर्मवरील साचलेले पाणी काढण्यासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, छताच्या काही ठिकाणी गळती आहे. पाऊस थांबल्यानंतर कायमस्वरूपी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली आहे. नांदेड हे मराठवाड्यातील महत्त्वाचे रेल्वे जंक्शन आहे. येथे दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र पावसाळ्यात दरवर्षी अशीच परिस्थिती निर्माण होत असल्याने प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या नियोजनावर नाराजी व्यक्त केली आहे. टिकिटाचे पैसे भरपूर घेतात, पण पावसात उभे राहायला छत नाही. ही काय सोय आहे? अशी प्रतिक्रिया एका प्रवाशाने दिली.



**हवामान विभागाचा अंदाज**

हवामान विभागाने पुढील २४ तासांसाठी नांदेड जिल्ह्यात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.


## आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

### विरोधी खासदारांचा अवघ्या १५ मिनिटांतच सभात्याग

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – केंद्र सरकारने पावसाळी अधिवेशनाच्या एक दिवस आधी रविवार, दि. १९ जुलै रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी बैठकीचे अध्यक्षपद भूषवले. ही बैठक संसद भवनाच्या परिशिष्टात सुरू झाली. या बैठकीला काँग्रेस, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि डीएमकेसह १० हून अधिक विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. मात्र, १५ मिनिटांनंतर विरोधी पक्षाचे खासदार सभात्याग करून बाहेर पडले.

अध्यक्ष ओम बिरला यांनी अद्याप २० बंडखोर टीएमसी खासदारांच्या गटाला मान्यता दिलेली नसताना सरकारने त्यांना बैठकीसाठी आमंत्रित केले, असा विरोधी पक्षांचा आरोप आहे. मात्र, हा सभात्याग प्रतिकात्मक होता. विरोधी पक्षाचे खासदार पुन्हा बैठकीत सामील झाले. दरम्यान, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, संसद सर्वांची आहे; गदारोळाने कोणाचाही फायदा होत नाही. संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलै रोजी सुरू होऊन १३ ऑगस्टपर्यंत चालेल. या काळात १९ बैठका होणार आहेत.

टीएमसीच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी सांगितले की, काँग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमके, जेएमएम, आम आदमी पार्टी, नॅशनल कॉन्फरन्स, डावे पक्ष आणि शिवसेना (यूबीटी) यांसह संपूर्ण विरोधी पक्ष सर्वपक्षीय बैठकीतून बाहेर पडला होता. त्यांनी सांगितले की, अखिल भारतीय तृणमूल काँग्रेसची (टीएमसी) सदस्यसंख्या कार्यालयीन यादीत २८ होती, तर अध्यक्षांनी एनसीपीआय नावाच्या एका अमान्य पक्षातील २० बंडखोर खासदारांच्या विलिनीकरणाला मंजुरी दिली नव्हती आणि त्यांच्या अपात्रतेच्या याचिका अद्याप प्रलंबित होत्या. महुआ म्हणाल्या, ९१ व्या घटनादुरुस्तीनुसार आता स्वतंत्र गटाला परवानगी नसताना संसदीय कामकाज मंत्र्यांनी या २० बंडखोर खासदारांना का आमंत्रित केले? निषेध म्हणून संपूर्ण विरोधी पक्षाने बैठकीवर बहिष्कार टाकला.



## वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनशिवाय इंजेक्शन विक्री; हजारोंचा मुद्देमाल जप्त, १ जण ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात बनावट अथवा वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री होणाऱ्या औषधांवर अंकुश ठेवण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा व अन्न आणि औषध प्रशासन यांनी संयुक्तपणे धडक कारवाई केली. या कारवाईत १५ हजार १८२ रुपये किमतीचे Mephentermine Sulphate Injection - WOFEN d TERMIV जप्त करण्यात आले आहे.

गोपनीय माहितीवरून दि. १८ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम पांढऱ्या व गुलाबी रंगाच्या पिशवीत *Mephentermine Sulphate Injection IP (WOFEN)* व *Mephentermine Sulphate Injection IP (TERMIV)* ही इंजेक्शने बेकायदेशीररित्या विक्रीसाठी घेऊन फिरत आहे.

या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पंचांसमक्ष फुले मार्केट परिसरात सापळा रचून कारवाई केली. कारवाईदरम्यान शेख वजाहत शेख हुसेन वय २७ वर्षे, रा. आर. एस. रेसिडेन्सी, डी.आर.डी. कॉलनी, फारुख नगर, नांदेड याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडील पिशव्यांची तपासणी केली असता तपासादरम्यान आरोपीकडे औषध विक्रीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे तसेच औषधांच्या खरेदी-विक्रीची बिलेही नसल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत आरोपीने ही इंजेक्शने मुश्फेक उर्फ अनस रा. देगलूर नाका, नांदेड याच्याकडून खरेदी करून जिम करणाऱ्या तरुणांना व इतर ग्राहकांना जास्त नफ्यासाठी बेकायदेशीररित्या विक्री करत असल्याची कबुली दिली.

या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त अशोक राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम २१० - अन्नपदार्थात भेसळ, २७८ - जीवनास धोकादायक औषध विक्री, १२५, जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५, औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० व औषध नियंत्रण किंमत आदेश DPCO २०१३ अन्वये नोंदवण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल भोसले व सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे तसेच पोलीस अंमलदार रवी बामणे, रितेश कुलथे, चंद्रकांत स्वामी, अनिल बिराजदार, अजरोदीन शेख, भाऊसाहेब राठोड, संतोष पोकळे, संतोष पावडे, ज्वालासिंग बावरी, इम्रान पठाण यांनी केली.

## वांगचुक यांना उपचारासाठी उचलणे चुकीचे नाही - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** –दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात दाखल सोनम वांगचुक यांच्याबाबत दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने म्हटले - सोनम वांगचुक १७-१८ दिवसांपासून उपोषणावर होते. या प्रकरणात खंडपीठाने आधीच आदेश दिला होता.

प्रकृती बिघडल्याने आणि खंडपीठाच्या आदेशामुळे त्यांना सरकारी रुग्णालयात नेण्यात आले. सरकारने त्यांना रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे या कारवाईला मनमानी म्हणता येणार नाही. वांगचुक यांना तिथेच औषधे दिली जात आहेत, ज्यासाठी त्यांची संमती आहे.

वास्तविक पाहता, सोनम यांच्या पत्नी गीतांजली यांनी वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयातून खाजगी रुग्णालयात हलवण्याची मागणी केली होती. या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होईल. दिल्ली पोलिसांनी शनिवारी सकाळी वांगचुक यांना जंतर-मंतरवरून उचलून सफदरजंग रुग्णालयात नेले होते. रुग्णालयातही वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे.

सीजेईपी आणि वांगचुक २८ जूनपासून नीट पेपरफुटी प्रकरणात जबाबदारी निश्चित करण्याच्या आणि शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या समर्थनार्थ आमरण उपोषणावर आहेत.

### 'आधी शिक्षणमंत्री, नंतर थेट प्रधानमंत्र्यांचा राजीनामा मागणार'

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचे नेतृत्वात मुंबई येथील आझाद मैदानात सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ आंदोलन करण्यात आले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. हे सरकार या आगीत भस्म झाले पाहिजे, असे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले. तर आदित्य ठाकरे यांनी देखील यावेळी बोलताना केंद्र सरकारवर टीका केली आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, देशातल्या तरुण आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी आज आंदोलने होत आहेत. आम्ही आता केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. पण ही तर फक्त सुरुवात आहे. पुढे जाऊन आम्ही थेट या देशाच्या पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी करणार आहोत, असा आक्रमक इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# नदीजोड प्रकल्प का रखडतोय?

दुष्काळ हा मराठवाड्याच्या नशिबी कायमचा लिहिलेला शब्द ठरू नये, यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना नव्हे तर कायमस्वरूपी जलव्यवस्थापनाची गरज आहे. अशा परिस्थितीत दमणगंगा-वैतरणा-गोदावरी आणि दमणगंगा-एकदरे-गोदावरी हे नदीजोड प्रकल्प मराठवाड्याच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरू शकतात. मात्र वन आणि पर्यावरण विभागाच्या मंजुरीअभावी हे दोन्ही प्रकल्प गेल्या सहा महिन्यांपासून रखडले आहेत. हा विलंब केवळ प्रशासकीय नसून, मराठवाड्याच्या विकासालाच अडथळा ठरणारा आहे. मराठवाडा हा पर्जन्यछायेतील प्रदेश असल्याने येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडतो. विशेष करून धाराशिव, लातूर या जिल्ह्यांमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जास्तच आहे. परिणामी सिंचनाचे प्रमाण आजही २१ टक्क्यांच्या आसपासच आहे. दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा, विहिरी कोरड्या पडणे, शेतीचे नुकसान आणि स्थलांतर अशा समस्या पुन्हा उभ्या राहतात. आजही शेकडो गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. ही परिस्थिती बदलण्यासाठी दीर्घकालीन उपाय म्हणून नदीजोड प्रकल्पांची संकल्पना पुढे आली आहे. पश्चिमेकडील नद्यांमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी समुद्रात वाहून जाते. हे अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्याकडे वळवून मराठवाड्याला उपलब्ध करून देण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे. जलसंपत्तीचे समतोल वितरण हीच नदीजोड प्रकल्पाची खरी ताकद आहे. एका भागातील अतिरिक्त पाणी दुसऱ्या पाणीटंचाईग्रस्त भागात पोहोचविणे ही काळाची गरज आहे. पण याला सुद्धा काही राजकीय लोकांनी विरोध केला हे दुर्दैव म्हणावे लागेल. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी प्रकल्पातून मराठवाड्यासाठी सुमारे ४.६८ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असून, ३३ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यामुळे केवळ शेती उत्पादन वाढणार नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पन्नही वाढेल. एकाच पावसावर अवलंबून राहणाऱ्या शेतीला बारमाही पाण्याचा आधार मिळाल्यास पीकपद्धतीत बदल होईल, बागायती क्षेत्र वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल. मराठवाड्यातील अनेक भागांत आजही पाण्याअभावी ऊस, फळबागा किंवा भाजीपाला यांसारखी अधिक उत्पन्न देणारी पिके घेणे शक्य होत नाही. नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास शेतकरी पारंपरिक पिकांबरोबरच नगदी पिकांकडेही वळू शकतील. त्यातून कृषी प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. म्हणजेच हा प्रकल्प केवळ पाणीपुरवठ्याचा नसून आर्थिक परिवर्तनाचा मार्ग ठरू शकतो. मराठवाडा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी जलसंधारण, शेततळी, बंधारे, ठिबक सिंचन आणि पावसाचे पाणी साठविणे या उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. मात्र त्याचबरोबर नदीजोड प्रकल्पासारखे मोठे पायाभूत प्रकल्पही आवश्यक आहेत. कारण स्थानिक जलस्रोतांची मर्यादा लक्षात घेता बाहेरून अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देणे अपरिहार्य ठरते. अर्थात, पर्यावरणीय नियमांचे पालन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वन आणि पर्यावरण विभागाने आवश्यक अभ्यास करून पर्यावरणाचा समतोल राखत निर्णय घ्यावा. मात्र राजकीय द्वेषापोटी मंजुरी प्रक्रिया अनावश्यकपणे लांबविणे योग्य ठरणार नाही. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल साधणे शक्य आहे. आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांच्या साहाय्याने हे प्रकल्प राबविता येऊ शकतात. राज्य सरकारने या प्रकल्पांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आता केंद्र आणि संबंधित विभागांनीही तत्परतेने आवश्यक परवानग्या देऊन कामाला गती देणे गरजेचे आहे. प्रत्येक वर्षी होणारा विलंब म्हणजे आणखी एक उन्हाळा टँकरवर अवलंबून राहणे, आणखी एक हंगाम कोरड्या शेतीचा आणि हजारो शेतकऱ्यांच्या आशा मावळण्याचा धोका होय. मराठवाड्याचा इतिहास दुष्काळाचा असला, तरी भविष्य समृद्धीचे असू शकते. त्यासाठी नदीजोड प्रकल्प हे केवळ अभियांत्रिकी काम नसून प्रदेशाच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्जागरणाचे साधन आहे. मराठवाड्याला कायमस्वरूपी जलसुरक्षा मिळवून देण्यासाठी हे प्रकल्प वेळेत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी असेल तर शेती, उद्योग, रोजगार आणि विकास असेल हे वास्तव लक्षात घेऊन नदीजोड प्रकल्पांना सर्वोच्च प्राधान्य देणे हीच आजची गरज आहे. हे प्रकल्प पूर्ण झाले, तर मराठवाडा खऱ्या अर्थाने सुजलाम, सुफलाम आणि समृद्ध होण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते अन्यथा शेतकऱ्यांवर 'पाणी देता का पाणी', असे म्हणण्याची वेळ येईल.

# भक्तवत्सल पांडुरंग!





पांडुरंगाचे परमभक्त संत तुकाराम महाराज हे नेहमी पांडुरंगाच्या नामात दंग असायचे. एकदा त्यांच्या घरी त्यांच्या वडिलांचे श्राद्ध होते. श्राद्ध म्हणजे मरण पावलेल्या व्यक्तीची पुण्यतिथी. त्यासाठी दोन ब्राह्मणांना बोलावले होते. त्यांना फळे आणि दक्षिणा द्यायची होती. मगच घरातील सर्वांची जेवणे व्हायची होती. काय सामान आणायचे ते सांगून जिजाईने त्यांना लवकर घरी यायची आठवण करून दिली. तुकाराम घरातून बाहेर पडले. मार्गावरून चालतांनाही त्यांचे पांडुरंगाचे नामस्मरण चालू होते. ते गावाबाहेर पोहोचले, तेव्हा एका शेतात कापणीचे काम चालू असलेले त्यांना दिसले. तुकारामांना पाहून शेतकरी म्हणाला, काम करायला येता का? काम कराल तर वेतन देईन, दाणेही देईन.

तुकाराम शेतात गेले आणि कणसे तोडू लागले. घरचे काम पार विसरूनच गेले. दुपार होत आली. ब्राह्मणही यायचे झाले होते. काय करायचे जिजाईला सुचत नव्हते. थोड्याच वेळात तुकाराम घरी आले. जिजाईने सांगितलेले सर्व सामान त्यांनी आणले होते. ती झटपट सिद्धतेला लागली. तुकाराम नदीवर गेले आणि आंघोळ करून घरी आले. तोपर्यंत ब्राह्मण आलेच होते. तुकारामांनी त्यांच्या पुढे केळी, पेरू आणि दुधाचे पेले भरून ठेवले अन् ते ग्रहण करण्याची प्रार्थना केली. नंतर तुकारामांनी ब्राह्मणांना दक्षिणा अर्पण करून नमस्कार केला. तुकारामांना आशीर्वाद देऊन ब्राह्मण घरी गेले. त्यानंतर सर्वांची जेवणे झाली. तुकाराम आपल्या बायकोला म्हणाले, जिजा, आता तू जेव. मी देवळात जातो आणि थोडा वेळ पडतो. तुकाराम देवळाकडे निघून गेले. जिजाईने स्वस्थपणे जेवण उरकले. ती बाहेर आली आणि पहाते तर समोरून तुकाराम येत आहेत.

तुकाराम फार दमलेले दिसत होते. तिला नवल वाटले. आताच तर तुकाराम घरी आले, ब्राह्मणांना फळे दिली, दक्षिणा दिली, सर्व कामे पूर्ण केली, हे आपण स्वत: पाहिले आणि आता पहाते हे दुसरेच ! ती तशीच देवळात गेली. तेथे कुणीच दिसत नव्हते. जिजाई पुरी भांबावली होती. तिने सारा प्रकार घरी येऊन तुकारामांना सांगितला. त्यांनी क्षणभर डोळे मिटले, हात जोडले आणि पांडुरंगाला प्रार्थना करू लागले. मग त्यांना सारा प्रकार समजला. तुकारामांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते मोठ्या आनंदाने तिला म्हणाले, जिजा, तू खरी भाग्यवान! आज पंढरीरायांनी माझे रूप घेतले. त्यांनीच तू सांगितलेले सामान आणून दिले आणि आजचा कार्यक्रम उत्तमरीतीने पार पाडला. वाटेत एका शेतकऱ्याने मला कामाला बोलावले. मी तेथे गेलो आणि घरचे काम विसरूनच गेलो. आज देवानेच माझी लाज राखली.

अध्यात्मात भावाला खूप महत्व आहे. त्यामुळेच भाव तिथे देव असे म्हटले जाते. भक्तवत्सल पांडुरंगाने संत सखूच्या घरी सखू बनून राहून तिच्या पतीची आणि सासू सासऱ्यांची सेवा केली, गोरा कुंभारासाठी त्याच्या बाळाला जिवंत केले, ज्ञानेश्वरांसाठी रेड्यामुखी वेद वदवले, एकनाथांच्या घरी पाणी भरले. जनाबाईसोबत दळण दळले, तुकारामांना सदेह वैकुंठगमन घडवले. आजमितीला लक्षावधी वारकरी आषाढी-कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने चालत पंढरीला जातात. त्यांच्या पायांना बळ देणारा, प्रतिदिन नवचैतन्य प्रदान करणारा, वारीच्या काळात त्यांचा चरितार्थ चालवणारा, त्यांच्या घरादाराची काळजी घेणारा पांडुरंग नव्हे तर आणखी कोण असतो? अनुभूती केवळ संतांना आल्या असे नव्हे आजमितीला दिंडीतील प्रत्येक वारकरी पांडुरंगाच्या अस्तित्वाची, त्याच्या माऊलीसम कृपेची पदोपदी अनुभूती घेत आहे. देवाच्या दिशेने एक पाऊल चालत गेलो तर देव १० पावले आपल्या दिशेने चालत येतो. फक्त आपला त्याच्याप्रती उत्कट भाव हवा. जिथे भाव असतो तिथे व्यवहार नसतो, स्वार्थ नसतो, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव नसते. पांडुरंगाची कृपा संपादन करायची असेल तर त्याच्याप्रतीचा भाव वाढायला हवा. चला तर, पांडुरंगाच्या प्रतिचा आपला भाव वाढण्यासाठी, त्याची अखंड कृपा संपादन करण्यासाठी त्याच्याच चरणी अनन्यभावाने शरण जाऊया!

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

# सारस्वत पुत्रांची वाटचाल कोणत्या दिशेने?

जिगर मुरादाबादी या सुप्रसिद्ध शायराचे अनेक चाहते होते. मोठ्या माणसांना हे भाग्य प्राप्त होते. त्यांच्या कोणत्याही कलाकृतीसाठी जान कुर्बान करायला त्यांचे चाहते तयार होतात. असाच त्यांचा एक चाहता त्यांना भेटला, पण त्याचा सूर मात्र वेगळा होता. या शायराला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणं त्याला आवश्यक वाटू लागलं. प्रसंग तसाच बाका होता. एखाद्या चाहत्यानं शायराच्या शायरीवर असं जीव ओवाळून टाकावा आणि त्याच्याच जीवावर बेतावं. त्या जीवघेण्या प्रसंगामुळं त्यांन मनातून जाम वैतागावं, चिडून जावं की, डोकं आपटून घ्यावं अशी त्याची अवस्था झाली होती. प्रत्यक्ष भेटीत शायराला मोठी हिम्मत करुन तो म्हणाला. काल महिलांच्या समारंभात अध्यक्षीय भाषण करताना तुमचा एक शेर पेश केला आणि महिलांच्या सभेतून माझ्या दिशेने अत्यंत वेगात अनेक चपला येवू लागल्या. प्रसंग बाका असल्यामुळं मी स्टेजच्या मागील बाजूने पलायन केल्यामुळं वाचलो. जिगरभाई तुमचा शेर एवढा परिणामकारक कसा काय ठरला? यावर हा शायर म्हणतो, माझा शेर पूर्ण परिणामकारक ठरला नाही. त्यामुळंच तुम्ही पळून जाऊ शकला. तो जर शंभर टक्के परिणामकारक ठरला असता तर तुमची इहलोकाची यात्रा जागीच संपली असती.

जिगर मुरादाबादी यांनी निर्मिलेल्या शायरीचा कुठे, कसा व केंव्हा उपयोग करावा? याचे भान जर त्या वक्त्याला नसेल तर असे प्रसंग निर्माण होणारच त्याला तो शायर जबाबदार नाही. व्यक्ती, स्थल, काल याचे भान जर आपल्याला नसेल तर आपण खरेच स्वत:ला विचारी माणूस म्हणवून घेण्याचे हक्कदार आहोत का? काहीअतीरेक्यांच्या भाषणाचे व्हीडीओ मी पाहिले. ती भाषण ऐकली की असे वाटते. आता आकाश खाली कोसळणार की काय? सब कुछ गल गल गला फाडके चील चील चील्लाना. हे पाहिल्यावर माझा एक मित्र म्हणाला, अरे यांचा आवाज एवढा चढतो कसा? मी त्वरित म्हणालो, अरे त्यांचा गळा विमानाला बांधलेला आहे. समोर बसलेल्या अज्ञानी जनतेची माथी भडकवण्यात हे लोक खूप यशस्वी होतात. पण एखादा ड्रोन हल्ला किंवा एक किलिंग मशीन यांना संपविण्यासाठी पुरेशी असते. यांना मानव बनविण्याचे कार्य काही महामानवांनी केले असेल हे मान्य. तोपर्यंत किती निरपराधांना जगाचा निरोप घ्यावा लागला असेल? शेवटी त्यांना त्यांचे मन-परिवर्तन करण्यात किती महामानवांना यश मिळाले असेल? नकारात्मक विचार व कृती करणारी माणसं अमानवी कृत्य करण्यात धन्यता मानतात. मानवतावादी मात्र त्यांना वाचवण्यासाठी आग्रह धरतात. असो, असा विनोद कोणत्या प्रकारात मोडतो हा एक संशोधनाचाच विषय?

मानवी शरीरात खऱ्या अर्थाने मानवी जीवन वास करत असेल तर अशा मृत्युंजयी महामानवास मृत्यूची भीती कोठे असते?



इतरांवर छुपाहल्ला करून पळ काढणारे अतिरेकी, नक्सली तर नंबर एकचे भेकड असतात. एक हास्यसम्राट आजारी होते. अंतिम आसन्नमरण अवस्थेत ते असताना प्रकृती क्षीण झाल्यामुळे त्यांना अंगावरील वस्त्र सावरता येत नव्हते. त्यांना त्याची खंत नव्हती. अंतिम श्वासापर्यंत हसत जगलो. इतरांनाही खळखळून हसविले. आता कोणत्याही क्षणी इहलोकाची यात्रा संपली तरी हरकत नाही. भेटायला आलेला एक तरुण सारखे त्यांचे धोतर निट करत होता.तेंव्हा ते हसत म्हणाले, अरे थांब थांब,'नंगेसे खुदा डरे'असं मी ऐकलय. मी असा विवस्त्र राहिलो तर मला तो ईश्वर काही वेळ तरी तुमच्या सोबत राहू देईल. भल्या माणसाला भल्या माणसांचा सहवास अंतिम क्षणापर्यंत महत्वाचा वाटतो. शेवटपर्यंत माणसांच्या गर्दीतला दर्दी माणूस ज्याला महत्वाचा वाटतो. तोच जीवनाचा खरा आनंद घेतं असतो. शेवटच्या श्वासापर्यंत हसत राहणे त्यालाच शक्य होते. 'रडतच आलो येतांना पण हासतं जावे जातांना' मनुष्य जीवनाची परिपूर्णता यातं आहे. हे त्यालाच कळालेलं असतं. जन्मत: हसत यावं हे आकलन त्याला लगेच त्यावेळी होणं शक्य नसतं. ते अनुभव, ज्ञान आणि आकलनाच्या बळावर होतं. मानवी जीवनाच्या अंतिमक्षणी मोहमायेत अडकलेले जीवं क्षणाक्षणाला भोकाड पसरताना दिसतातं, तेंव्हा त्या पामरांची किव तरी किती करावी? त्यांच्याकडे पाहून हसावे की रडावे हेचं कळत नाही. आपल्या दु:खाचे प्रदर्शन करणारे, त्याला घट्ट कवटाळणारे, संधी मिळेल तिथे दु:ख कोळश्याप्रमाणे उगाळणारे मानवी देहातीलं भेकड किडे-मकोडे सहानुभूतीसाठीही पात्र नसतात हेच सिद्ध होते. त्यांची भ्याड आणि भेकडवृती चेष्टा मस्करीचाच विषय ठरणार हे निश्चित.

व्यायामाच्या अभावामुळे प्रतिकारशक्ती अत्यंत कमी असलेली माणसे अगदी थोड्याफार प्रतिकूल वातावरणाने लगेच हैराण होतात आणि आपणास न मानवणाऱ्या वातावरणामुळे शंखनाद करतात. मो. ग. रांगणेकरांच्या नाटक कंपनीत पु. ल. कार्यरत होते. नाटक कंपनी नागपुरात होती. थंडी खरेच जाणवनारी होती. तरी ती काय मायनस डिग्री सेल्सीयस वगैरे अशी नव्हतीच. विदर्भातील थंडी जास्त असून, किती असणार? इथे काय पाण्याचे गोठून आपोआप बर्फ झाले किंवा बोलता बोलता आपल्या शब्दाचाच बर्फ गोळा झाला. असे ऐकीवात नाही, त्यामुळे प्रत्यक्ष अनुभवात ते असणे शक्य नाही. नाटक कंपनीतील प्रत्येक कलाकार मात्र सकाळ होताच उठता क्षणी एकच मंत्रोच्चार त्यांच्या मुखी होता. अरे बापरे काय थंडी होती रात्री. असे म्हणत उबदार कापडातून बाहेरच पडत नव्हता. वॉकिंग, रनिंग किंवा शारीरिक ऊर्जा वाढविणारा कोणताही व्यायाम करुन शरीर थंडीमुक्त करणे या नाजुक कलाकाराकडून शक्य नव्हते. तेवढ्यात पु. ल. मात्र मॉर्निंग वॉक करून आले. उबदार ब्लँकेट गुंडाळून पडलेले तब्बलजी मामा ब्लँकेटच्या आतूनच म्हणायला लागले. अहो, भाई चालायला गेला होतातं काय? आजारी पडाल ना. आम्ही काय सांगायचे सुनीताबाईंना.अहो काय थंडी आहे, काय थंडी आहे ही. माझे दातावर दात तर आपोआपच आपटत होते की हो. नागपूरी थंडी म्हणतात ती काय असते? ते आज कळले हो. तेंव्हा पु. ल. तात्काळ म्हणाले, अहो मामा, तुम्ही रात्री वाटीत काढून ठेवलेल्या दाताच्या कवळ्यासुद्धा एकमेकावर सारख्या आपटत होत्या. मी तर त्या आवाजाने जागा झालो. आता त्या वाटीत आहेत का, तुमच्या ब्लँकेटात घुसून झोपल्या? ते पहा तरी हो एकदा. पु. ल. चा विनोद असा थेट मामाच्या ब्लॅकेटपर्यंत पोहचल्याने एकच हास्यकल्लोळ झाला. तब्बलजी मामा मात्र पुरते खजिल झाले. आपल्या अय्याशी व आळशीपणाचा पु. ल. असा काही तबला वाजवतील याची त्या तब्बलजी मामांनी स्वप्नातही कल्पना केली नसेल.

पु. ल.चे चौफेर व्यक्तीमत्व मराठी साहित्याला मिळालेली अनमोल देण होती. हे मराठी माणसाला मान्य करावेच लागेल. विनोदीलेखक, कवी, विचारवंत, समाजहितचिंतक, प्रभावीवक्ते, विनोदवीर, नाटककार, चित्रपट लेखक, अभिनेते, दिग्दर्शक, संगीतकार असे केवळ अष्टपैलूच नव्हे तर सर्वपैलू व्यक्तीत्व. त्यांनी केलेली बालहास्यकविता अशी-'खुदकन हसूचे पैसे आठ,' 'खो खो खो'चे एकशेसाठ। हसावयाचा करतो धंदा, कुणी निंदा कुणी वंदा।। ही हास्यकविता बालकविताही होवू शकते म्हणून या कवितेसाठी बालहास्यकविता असा शब्दप्रयोग मी केला आहे. लहान मुलांच्या स्मरणात सहज राहते व ते तिचा गाऊन, उड्या मारुन आनंद घेवू शकतात. नसता एक कविराज मी असेही पाहिले होते. त्यांनी एका महापुरुषावर १०० पानाची दीर्घकविता केली होती. बालकविता पुरस्कार स्पर्धेत पाठवली आणि विशेष सांगायचे म्हणजे त्यांच्या या दीर्घकवितेला पुरस्कार समितीनी पुरस्कारही दिला होता. मात्र मुलांनी ही कविता कशी स्मरणात ठेवायची आणि तिचा आनंद कसा घ्यायचा? या प्रश्नाचे उत्तर ना त्या महान कवीकडे होते, ना त्या पुरस्कार समितीकडे? त्यामुळे त्या कविराजची व त्या पुरस्कार समितीची गिनिजबुकात नोंद घेतली पाहिजे व त्या सर्वांना राष्ट्रपतीच्या हस्ते किमान एकेक लाखाचा फोर फाऊंडेशन पुरस्कार दिला पाहिजे. साहित्यक्षेत्रातील अशा प्रज्ञावंताची किंचितही उपेक्षा होणार नाही. याची संबंधितांनी काळजी घेतली पाहिजे. खरेच या सारस्वतपुत्रांची वाटचाल कोणत्या दिशेने सुरु आहे?

नवोदित साहित्यिकांनी निर्माण केलेली साहित्य निर्मिती त्यांच्यासाठी खूप मोठा कुतूहलाचा विषय असते. ती निर्मिती आपण कुणाला तरी दाखविली पाहिजे. त्याने एक कौतुकाची थाप आपल्याला द्यावी. व्यक्ती लहान असेल तर किमान त्याच्याकडून चार शब्दसुमने. बस्स त्यापेक्षा अधिक काहीच नको आणि ते सगळे ऐकविण्यासाठी पहिला हक्क आपल्या पत्नीवर गाजविणाऱ्या पतीराजावर अनेक महिला एकतर कमालीच्या नाराज असतात किंवा त्या अरसिक तरी असतात. अशा पतीपत्नी प्रवृतीवर पु. ल. नी केलेली रचना पहा. कवी पत्नीस म्हणतो, ऐकशील कागं माझे हे झुळझुळीत गीत? त्यावर लगेच पत्नी म्हणते, द्या ते इकडे घालते चुलीत. हे अनपेक्षित उत्तर ऐकताच ह्या कविराजांना जबरदस्त शॉक बसतो आणि तो पुढे म्हणतो, हाय दैवा! काय गति ही. अरसिकता किती ही पहा. त्यावर पत्नीचा व्यवहारवाद पहा. पेटविते बाड, होईल बादली भरुन चहा! या काव्यरचनेवरून भिन्न प्रवृतीचे दोन ध्रुव एकत्र आल्यावर, आपली आवड सतत पत्नीवर लादल्याने पतीकाव्यपीडित पत्नीच्या तोंडून यापेक्षा वेगळे कोणते उद्गार निघणार?

हायकू हा जपानी काव्यप्रकार. तीन ओळीचा, सतरा शब्दाचा, मितभाषी व बंदिस्त घाटाचा काव्य प्रकार.जपानमध्ये विशेष लोकप्रिय आहे. यात पहिल्या ओळीत पाच, दुसऱ्या ओळीत सात आणि तिसऱ्या ओळीत पुन्हा पाच शब्दावयव अशी रचना असते. विकसित देशातले सर्व काही चांगले, दर्जेदार व उत्कृष्ठ असे समजून उचलेगिरी करणारे मराठी कवी. पु. ल. ना अशा कवितांचा व त्या डोक्यावर घेवून नाचणाऱ्या कवींचा भारी संताप यायचा. त्यावर या कवितेचे काव्यमूल्य काय? हे लक्षात आणून देण्यासाठी यावर त्यांनी केलेले विडंबन काव्य असे-'एक कोंबडी खुडूक बसली, आता नुसतीच घालते बांग । खुडूक कवी हायकूशिवाय आणखी काय करील सांग।। या प्रकारची साहित्यनिर्मिती करुन मराठी साहित्य विश्वात आपण कोणती भर घालणार आहोत? यावर या नवोदितांनी विचार करावा. ही अपेक्षा या प्रज्ञावंताची असणे साहजिक आहे. ती अपेक्षापूर्ती नवोदितांनी व साहित्यातील प्रगल्भतेचा शोध घेणाऱ्या जाणकारांनी घेतल्यास साहित्य समृद्धीची वाटचाल वेगवान होईल, अशी अपेक्षा करुया.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडणा
मो. ९०११२२९२३२

# समाजवादी चळवळीतील शेवटचा तारा निखळला



ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, युवक क्रांती दलाचे संस्थापक, गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, माजी आमदार आणि अभ्यासू लेखक डॉ. कुमार सप्तर्षी यांचे १८ जुलै रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. समाजवादी विचारांना आयुष्यभर निष्ठेने वाहून घेतलेल्या या लढवय्या व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपल्याची भावना अनेकांच्या मनात आहे.

डॉ. कुमार सप्तर्षी हे केवळ राजकारणी नव्हते; ते प्रभावी वक्ते, सखोल अभ्यासू विचारवंत, निर्भीड लेखक, कुशल संघटक आणि सामाजिक परिवर्तनासाठी आयुष्य वेचलेले कार्यकर्ते होते. समाजातील विषमता, अन्याय, भ्रष्टाचार आणि जातीयतेविरुद्ध त्यांनी सातत्याने आवाज उठवला. लोकशाही, समाजवाद, समता आणि संविधानिक मूल्यांवर त्यांची दृढ श्रद्धा होती. आपल्या लेखणीतून, व्याख्यानांतून आणि चळवळींतून त्यांनी हजारो युवकांना वैचारिक दिशा दिली. त्यांच्या प्रेरणेने अनेक तरुण युवक क्रांती दलात सहभागी झाले. त्यांपैकी अनेकांनी पुढे आमदार, खासदार, मंत्री आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून नावलौकिक मिळवला.

२१ ऑगस्ट १९४१ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील खेड या छोट्याशा गावात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण राशीन येथे, तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण नगर येथे झाले. विद्यार्थी दशेतच त्यांना वाचनाची गोडी लागली. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या काळात नगरमध्ये येणाऱ्या नेत्यांची भाषणे ते आवर्जून ऐकत असत. त्या चळवळीतील विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुण्यातील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९६४ मध्ये ते महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी (जी.एस.) म्हणून निवडून आले. याच काळात त्यांना अभिनेते आणि समाजवादी कार्यकर्ते निळू फुले यांचा सहवास लाभला. निळू फुले यांनी त्यांना समाजवादी साहित्य वाचण्यास प्रवृत्त केले आणि डॉ. राममनोहर लोहिया यांच्याशी परिचय करून दिला. पुढे लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या सहवासाने त्यांच्या विचारांना अधिक व्यापक दिशा मिळाली. त्यांनी जयप्रकाश नारायण यांना गुरुस्थानी मानले. कार्ल मार्क्स, लेनिन, माओ, डेव्हिड थेरो, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचाही त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर प्रभाव होता.

१९६७ मध्ये त्यांनी युवक क्रांती दलाची स्थापना केली. या संघटनेने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर आणि सामाजिक न्यायासाठी अनेक प्रभावी आंदोलने उभारली. पुढे जयप्रकाश नारायण यांच्या सूचनेनुसार त्यांनी जनता पक्षात प्रवेश केला आणि आमदार म्हणूनही कार्य केले. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

डॉ. सप्तर्षी यांनी साहित्य क्षेत्रातही मोलाची भर घातली. येरवडा विद्यापीठातील दिवस हे त्यांचे आत्मचरित्र विशेष गाजले. व्यक्तिरंग, धर्माबद्दल यांसारखी पुस्तके त्यांनी लिहिली. तसेच सत्याग्रही विचारधारा हे मासिक दीर्घकाळ चालवून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आजच्या काळात वैचारिक राजकारण दुर्मिळ होत असताना डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यासारखा निस्वार्थी, तत्त्वनिष्ठ आणि संघर्षशील नेता काळाच्या पडद्याआड जाणे ही समाजासाठी मोठी पोकळी आहे. त्यांनी जपलेली लोकशाही, समाजवाद, सामाजिक न्याय आणि मानवतेची मूल्ये नव्या पिढीने आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक विश्वात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. समाजवादी चळवळीतील अखेरचा तेजस्वी तारा निखळल्याची भावना त्यांच्या जाण्याने अधिक तीव्र झाली आहे. डॉ. कुमार सप्तर्षी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे

# ४७१ हरवलेले मोबाईल पालकमंत्र्यांच्या हस्ते मूळ मालकांना परत

## नांदेड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी; सीईआयआर तंत्रज्ञानाने शोधले ६५ लाखांचे मोबाईल




**नांदेड (प्रतिनिधी)–** हरवलेले व चोरीला गेलेले मोबाईल जिल्हा पोलिसांनी शोधून नागरिकांना परत करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने शोधण्यात आलेले एकूण ४७१ मोबाईल फोन, ज्यांची अंदाजे किंमत ६५ लाख ३७ हजार आहे. ते आज मूळ मालकांना परत करण्यात आले.

याबाबत दि. १७ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मोबाईलधारकांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले.

नांदेड जिल्ह्यात मोबाईल हरवल्यानंतर किंवा चोरीला गेल्यानंतर नागरिकांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. या तक्रारीनंतर CEIR (Central Equipment Identity Register) प्रणालीद्वारे IMEI क्रमांकाच्या आधारे मोबाईल शोधण्याची मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे आणि विशेषतः सायबर पोलीस स्टेशन येथील विशेष पथकाने CEIR पोर्टलचा प्रभावी वापर करून विविध राज्यांतून व जिल्ह्यांतून हे मोबाईल शोधून काढले.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्री अतुल सावे यांनी नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या तांत्रिक क्षमतेचे आणि नागरिकाभिमुख कार्यपद्धतीचे कौतुक केले. अशाच प्रकारे जनतेचा विश्वास संपादन करणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

ही उल्लेखनीय कामगिरी अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण, जनसंपर्क अधिकारी आशिष बोराटे आणि सायबर पोलीस स्टेशनमधील अंमलदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, विलास राठोड, दाविद पिडगे, मोहम्मद आसिफ, काशिनाथ कारखेडे, ज्ञानेश्वर यन्नावार, दीपक राठोड, साई शेंडगे, अविनाश ठोके, महेश बडगु, महिला अंमलदार कांचन कसबे, रेश्मा पठाण, शुभांगी जाधव यांनी पार पाडली.

नांदेड जिल्हा पोलीस दलामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, मोबाईल हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी आणि CEIR पोर्टलवर आवश्यक माहिती अपलोड करावी. वेळेत तक्रार नोंदवल्यास मोबाईल शोधण्याची शक्यता अधिक वाढते.

# महानगरपालिकेत स्थायी समिती सभापतींनी घेतली आरोग्य विभागाची आढावा बैठक

## पालिका दवाखान्यांच्या अडचणी सोडवून उपाययोजना करण्याचे निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी शुक्रवार, दि. १७ जुलै रोजी महापालिकेच्या आरोग्य विभागाची एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी शहरातील पालिका दवाखान्यांची सद्यस्थिती, तेथील अडचणी आणि नागरिकांना मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. तसेच उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

स्थायी समिती सभापतींनी बैठकीच्या सुरुवातीलाच शहरातील विविध भागांतील पालिका दवाखान्यांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. दवाखान्यांमध्ये येणाऱ्या रुग्णांची संख्या, उपलब्ध औषधसाठा, आवश्यक वैद्यकीय उपकरणे आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती यावर सखोल चर्चा झाली. अनेक दवाखान्यांमध्ये पायाभूत सुविधा, औषधांची टंचाई किंवा तांत्रिक अडचणींमुळे रुग्णांना त्रास होत असल्याचे समोर आले. या सर्व अडचणी प्राधान्यक्रमाने सोडवण्याचे आश्वासन सभापतींनी दिले.

बैठकी दरम्यान सभापतींनी उपस्थित सर्व वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. त्यांनी आरोग्य सेवकांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय आणि स्थानिक पातळीवरील समस्या जाणून घेतल्या. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मांडलेल्या समस्यांवर सकारात्मक मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही देत सभापतींनी सर्वांना अधिक तत्परतेने काम करण्याचे आवाहन केले.

महापालिकेची आरोग्य यंत्रणा अधिक गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी स्थायी समिती सभापतींनी प्रशासनाला कडक निर्देश दिले. त्यात प्रामुख्याने पालिका दवाखान्यांमध्ये अत्यावश्यक औषधांचा तुटवडा जाणवणार नाही याची काळजी घ्यावी. दवाखान्यांच्या इमारती आणि वैद्यकीय उपकरणांची तातडीने दुरुस्ती करावी. प्रत्येक आरोग्य केंद्राच्या परिसरात आणि अंतर्गत भागात उत्कृष्ट स्वच्छता राखण्यात यावी. तसेच वैद्यकीय अधिकारी आणि प्रशासन यांच्यात कामाचा योग्य समन्वय असावा, या निर्देशांचा समावेश होता.

शहरातील प्रत्येक नागरिकाला, विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना पालिकेच्या माध्यमातून मोफत आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळाली पाहिजे हा आमचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन सभापतींनी बैठकीच्या शेवटी केले. आरोग्य विभागाच्या बळकटीकरणासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आरोग्यसेवा क्षेत्रातील उज्ज्वल करिअरची नवी वाट : स्वारातीम विद्यापीठात बी.एस्सी. एम.एल.टी. अभ्यासक्रम



**नांदेड (प्रतिनिधी)–** आरोग्यसेवा क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची वाढती गरज लक्षात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या जैविकशास्त्र संकुलामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी.एस्सी. इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (बी.एस्सी. डीएमएलटी) हा रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. नीट नंतर एमबीबीएस व्यतिरिक्त वैद्यकीय क्षेत्रात करिअर घडविण्यासाठी हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी ठरत आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मराठवाड्यातील विद्यार्थी लवकरात लवकर स्वावलंबी झाला पाहिजे, त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे आणि तो जागतिक स्पर्धेत सक्षमपणे टिकला पाहिजे, या दूरदृष्टीतून तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व अथक प्रयत्नांतून हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

आधुनिक आरोग्यसेवा व्यवस्थेत डॉक्टरांइतकीच महत्त्वाची भूमिका वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञांची असते. विविध आजारांच्या अचूक निदानासाठी रक्त, लघवी, पेशी, ऊती आदींच्या तपासण्या अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये केल्या जातात. त्यामुळे प्रशिक्षित वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञांची मागणी सातत्याने वाढत असून, हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध करून देणारा ठरत आहे.

तीन वर्षांच्या या कौशल्याधारित अभ्यासक्रमामध्ये नैदानिक जीवरसायनशास्त्र, रक्तशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, रोगप्रतिकारशास्त्र, ऊतीविकृतशास्त्र, अण्विक निदानशास्त्र, नैदानिक रोगविज्ञान, रक्तपेढी व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण तसेच आधुनिक प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच विद्यार्थ्यांना अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभवही दिला जातो.

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्लिनिकल लॅबोरेटरी सायंटिस्ट, पॅथॉलॉजी लॅब तज्ज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, अण्विक निदान तंत्रज्ञ, सूक्ष्मजीवशास्त्र व जीवरसायनशास्त्र प्रयोगशाळा विशेषज्ञ, गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, संशोधन सहाय्यक, प्रयोगशाळा पर्यवेक्षक व व्यवस्थापक अशा विविध पदांवर सरकारी, निमसरकारी तसेच खासगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांनी या रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जैविकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. बी. एस. सुरवसे यांनी केले आहे.

# कुसळवाडीत सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ काढली रॅली



**तामसा (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हक्क व जनहिताच्या विविध मागण्यांसाठी उपोषणाला बसलेले अभियंता, शिक्षणतज्ज्ञ व मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी कुसळवाडी ( ता. हदगाव ) येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने समर्थन रॅली काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात गावातील पोलीस पाटील तथा सरपंच गंगाधर भुरके यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर गावातून शिस्तबद्ध पद्धतीने रॅली निघाली.

या रॅलीदरम्यान सहभागी नागरिकांनी सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा देत त्यांच्या मागण्यांना जाहीर पाठिंबा व्यक्त केला. या रॅलीमध्ये सरपंच शिवाजी चिभडे, सरपंच पार्वतीबाई डुकरे, सरपंच शोभाताई वानोळे, ग्रामपंचायत सदस्या इंद्राबाई भुरके, बायनाबाई धुमाळे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवाजी भुरके, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पिराजी ढोले, उपाध्यक्ष सुरेश देशमुखे, वरिष्ठ नागरिक काशिबा डुकरे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष, युवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रॅलीचा समारोप गावातील क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी सामाजिक न्याय, शिक्षणाचा अधिकार आणि पर्यावरण संरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला आपला नैतिक पाठिंबा असल्याचे व्यक्त केले.

संपूर्ण रॅलीदरम्यान गावचे पोलीस पाटील हरिश बोंबले यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून नियोजन, शिस्त व सुरक्षिततेवर विशेष लक्ष ठेवत मोलाचे सहकार्य केले. ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही समर्थन रॅली शांततापूर्ण, शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. रॅलीचे आयोजन सरपंच श्रीरंग देशमुखे व युवकांनी केले होते.

# नांदेडमध्ये किकबॉक्सिंगचा महासंग्राम; पिंपरी-चिंचवड संघाने पटकावले जेतेपद



**नांदेड (प्रतिनिधी)–** किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन नांदेड डिस्ट्रिक्ट व किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ऑल महाराष्ट्र स्टेट सीनियर अँड मास्टर किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२६' नुकतीच नांदेड येथे उत्साहात पार पडली.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते झाले. या वेळी महाराष्ट्र असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार व सचिव धीरज वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते. राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो खेळाडूंनी पॉईंट फायटिंग, लाईट कॉन्टॅक्ट, किक लाईट आणि रिंग इव्हेंट्समध्ये आपले कौशल्य दाखवले.

या कार्यक्रमाला क्रीडा अधिकारी संजय बेतेवार, नगरसेवक प्रतिनिधी राजू लांडगे, ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव राहुल वाघमारे, शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, माजी सभापती नरेंद्र गायकवाड आणि ॲड. प्रसेनजीत वाघमारे उपस्थित होते.

# माता रमाई आवास योजनेतील कथित गैरव्यवहाराच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी



नांदेड (प्रतिनिधी)– महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या माता रमाई आवास योजनेत कथित आर्थिक गैरव्यवहार, शासकीय निधीचा गैरवापर आणि अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांवर अन्याय झाल्याचा आरोप करत प्रभाग क्रमांक ५-अ चे नगरसेवक तथा भाजपा महानगर उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

नव्याने निविदा प्रक्रिया न राबविता सल्लागार संस्थेचा कार्यकाळ वाढविण्यात आल्याचा, शासनाने लाभार्थ्यांसाठी मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा अधिक रकमेच्या आधारावर सल्लागार संस्थेला सेवा शुल्क अदा करण्यात आल्याचा तसेच या व्यवहारातून शासकीय निधीचा कथित गैरवापर झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्य लेखापरीक्षकांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांकडेही दुर्लक्ष करण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# वसरणी येथील एसआयआर मतदार नोंदणी अभियानला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तहसील व मनपा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने वसरणी येथील हनुमान मंदिर प्रांगणात आयोजित एसआयआर मोहिमेला १६ जुलै २६ रोजी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रभाग क्रमांक १९ मधील लोकप्रतिनिधी व सिडको क्षेत्रीय सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी भेट देऊन पाहणी केली.

१६ जुलै रोजी वसरणी येथील हनुमान मंदिर प्रांगणात एसआयआर मोहीम अभियान आयोजित करण्यात आले होते. यावेळी नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, संजय मोरे, विनोद काकडे, संतोष मोरे यांच्यासह निवडणूक अधिकारी अविनाश शिनगारे, व्यवस्थापक अंगद जाधव, करनिरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, नारायण आठवले, लिपीक उत्तम जाधव, सहशिक्षक आर. एस. स्वामी, सौ. अर्चना जोशी, राजेश भंगे, खानापूरकर, देवकते, सहशिक्षका कांबळे, अंगणवाडी सेविका सुनिता चिंतोरे, करूणा ढवळेबाई, अनिता चौदंते, विजयमाला बनसोडे यांच्यासह आशा वर्कर्स यांनी सहकार्य केले.

यावेळी वसरणी येथील विविध भागातील मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून गणनापत्र भरून दिले. यावेळी गावातील संजय लव्हेकर, सुदर्शन गजभारे, सखाराम चितळे, दिगांबर जटाळे, माधव जटाळे यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक व युवक यांनी सहकार्य केले. लोकप्रतिनिधी सुलोचना काकडे, सौ. दीपाली मोरे, सौ. अनुराधा पाटील काळे, अभिषेक सौदे यांनी प्रभागातील विविध भागात एसआयआर मोहीम विविध भागात आयोजित केली आहे.

# रजा चौक देगलूर नाकातील प्रस्तावित पेट्रोल पंपाला विरोध; आंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)–** रजा चौकातील बरकत कॉम्प्लेक्स परिसरातील वर्दळीच्या जंक्शन पॉईंटवर प्रस्तावित सय्यद अरशद अली यांच्या आयओएल पेट्रोल पंपाला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने विरोध दर्शविला आहे. पेट्रोलियम अधिनियम १९३४, पेट्रोलियम नियम २००२ तसेच रस्ते सुरक्षा निकषांचे पालन न करता पेट्रोल पंपाला एनओसी अथवा अंतिम मंजुरी देऊ नये, अशी मागणी जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रस्तावित जागा जंक्शन पॉईंटपासून अवघ्या १० मीटर अंतरावर आहे. नियमानुसार आवश्यक अंतर उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जागेलगत निवासी घरे असून, स्थानिक रहिवाशांनीही पेट्रोल पंपाला आक्षेप नोंदविला आहे. परिसरातील वाहनांची व विद्यार्थ्यांची वर्दळ, वाहतूक कोंडी, अपघाताचा संभाव्य धोका तसेच लगतच्या हॉटेलच्या किचनमुळे अग्निसुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

नागरिकांचे आक्षेप आणि सुरक्षेचे गंभीर प्रश्न असतानाही प्रशासनाकडून एनओसीची प्रक्रिया पुढे नेली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रशासनाने नियम व सार्वजनिक सुरक्षेचा विचार करून एनओसी प्रक्रिया तत्काळ थांबवावी; अन्यथा तीव्र आंदोलन करून न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा फैसल सिद्दीकी यांनी दिला आहे.

# स्वारातीम विद्यापीठाच्या बहिस्थ शिक्षण विभागाची सहविचार सभा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बहिस्थ शिक्षण विभागाची सहविचार सभा मंगळवार, दि. १५ जुलै रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

सभेस प्रमुख पाहुणे म्हणून प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर दादाजी पवार यांनी सहभाग नोंदविला. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा विभागाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारोती गायकवाड, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सभेत बहिस्थ शिक्षण विभागाच्या शैक्षणिक, प्रशासकीय तसेच परीक्षा विषयक विविध बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभ्यास केंद्रांमधील समन्वय अधिक प्रभावी करणे, प्रवेश प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करणे, परीक्षा नियोजन अधिक सक्षम करणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देणे तसेच विद्यापीठाच्या धोरणे व सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी बहिस्थ शिक्षण विभागामार्फत रोजगाराभिमुख नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा विद्यापीठाचा विचार आहे. बदलत्या काळातील कौशल्याधारित शिक्षणावर भर देत विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचे उद्दिष्ट विद्यापीठाचे आहे.

बहिस्थ शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहालानी यांनी विभागाच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, बहिस्थ शिक्षण विभाग हा केवळ शैक्षणिक कामकाज करणारा विभाग नसून समाजाभिमुख सेवा देणारा विभाग आहे. शिक्षणाला चार भिंतींच्या मर्यादेत न ठेवता ते प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हा विभाग सातत्याने करीत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नारायण शिवशेटे व सिमरन प्रेमचंदानी यांनी केले. सदर सहविचार सभा यशस्वी होण्यासाठी बहिस्थ शिक्षण विभागातील वरिष्ठ लिपिक विष्णू भुसारे, सुरेश देशमुख, डेटा ऑपरेटर अजय इंगोले, संकेत साखरे व शिल्पा धनमणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांना 'यशवंत'मध्ये अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी कै. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयिका डॉ. एल. व्ही. पदमारानी राव, प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, ग्रंथपाल डॉ. कैलास वडजे, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. शिवराज शिरसाठ, डॉ. श्रीकांत जाधव, डॉ. दीप्ती तोटावार, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. वंदना बदने, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, विविध विभागप्रमुख, प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथालयीन कर्मचारी आदींनी अभिवादन केले.

CMYK

# शिवार

# सोयाबीन : किडींचे एकात्मिक व्यवस्थापन

सोयाबीन हे एक मुख्य तेलबिया पीक असून, खरीपात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. एकूण तेल उत्पादनापैकी सुमारे ५८ टक्के वाटा हा सोयाबीन तेलाचा असून, एकूण प्रथिनांपैकी ६० टक्के प्रथिने सोयाबीनमधून उपलब्ध होतात. ९० ते ११० दिवसांत येणाऱ्या या पिकांवर वेगवेगळ्या किडींचा प्रादुर्भाव होऊन उत्पादनामध्ये मोठी घट होते. या किडींचे वेळीच नियंत्रण करणे आवश्यक आहे.



## पांढरी माशी

» पांढरी माशी साधारणतः ०.८-१.० मि. मी. लांबीची असते. शरीर व दोन्ही पंखांच्या जोड्या पांढऱ्या ते पिवळसर रंगाच्या भुकटी सारख्या मेणाच्या स्रावाने आच्छादलेले असते. त्या बहुदा पानाच्या खालच्या बाजूला आढळतात. झाड हलवल्यास पांढरी माशी थव्याने उडते. माशी पानाच्या खालील बाजूला अंडी घालते. पिल्ले पिवळी ते पांढरी रंगाची चपटी आकाराची असतात. पिकाशिवाय अन्य यजमान वनस्पती किंवा तणांवर अन्य वेळी उपजीविका करते. त्यामुळे योग्य प्रकारे तणनियंत्रण केल्यास प्रादुर्भाव आटोक्यात ठेवणे शक्य होते.

» नुकसानीचा प्रकार अन् जीवनक्रम : या किडींचा जास्त प्रादुर्भाव झाल्यास सोयाबीन पिकाची पाने पिवळी पडतात. पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावामुळे झाडाची पाने गोळा होतात किंवा वाटीसारखी होऊन विकृत होतात. झाडाच्या पानावर व खोडावर बुरशींची वाढ होते. पांढऱ्या माशीने झाडातील रस शोषून घेतल्याने झाडाची वाढ खुंटते.

### असे करा नियंत्रण

» एकरी २० याप्रमाणे पिवळे चिकट सापळे सोयाबीन शेतात लावावेत. पांढऱ्या माशीला आकर्षित करणारी किंवा प्रतिबंध करणारी सापळा किंवा आश्रय पिके लावावीत. मका, ज्वारी आणि बाजरी या सारखी उंच पिके पिकाच्या कडेने दाट लावावीत. कोवळ्या रोपांवर पांढऱ्या माशीचा लवकर प्रादुर्भाव होतो. त्यामुळे कोवळ्या रोपांचे जास्त निरीक्षण करावे.


## तंबाखूवरील पाने खाणारी अळी

» शास्त्रीय नाव : स्पोडोप्टेरा लिट्युरा. ही कीड बहुभक्षी असून अनेक पिकांवर प्रादुर्भाव दिसून येतो. प्रौढ पतंग २-३ सें.मी.असून फिकट भुरकट रंगाचा असतो, त्याच्या पंखांवरील पांढऱ्या रंगाच्या वेड्या-वाकड्या रेषा असतात. खालच्या बाजूचे पंख पांढरे असतात. प्रौढ मादी तिच्या आयुष्यात १२०० ते २००० अंडी २०० ते २५० च्या पुंजक्यामध्ये पानाच्या खालच्या बाजूस घालते. त्यावर गुलाबी रंगाची तंतुमय लव आच्छदलेली असते. अंड्यातून निघालेल्या लहान अळ्या एका पानावर १०० ते १५० इतक्या समूहाने पानातील हरितद्रव्ये खातात. पातळ कागदासारखी जाळी झालेली पाने शेतात दिसू लागतात. अशी जाळीदार पाने दिसताच या किडीचा प्रादुर्भाव असल्याचे ओळखावे. पूर्ण विकसित झालेल्या अळ्या हिरवट, भुरकट, मळकट केशरी रंगाच्या असतात. या अळीच्या शरीरावर दोन फिक्कट पट्टे असून शरीराच्या प्रत्येक खंडावर दोन्ही बाजूंनी काळ्या रंगाचे ठिपके दिसतात. पूर्ण वाढ झालेली अळी ३० ते ४० मि.मी. लांब असते. मोठ्या अळ्या स्वतंत्रपणे पाने खात केवळ शिरा शिल्लक ठेवतात. या किडीचा प्रादुर्भाव पीक फुलोऱ्यात असताना, शेंगा तयार होताना झाल्यास फुले व शेंगा खाऊन नुकसान करतात. या किडीचा कोष जमिनीवर पडलेल्या पानांमध्ये तयार होतो.

» आर्थिक नुकसान पातळी : १० अळ्या प्रति मीटर फुले येण्याच्या आधीच्या अवस्थेत व ३ अळ्या प्रति मीटर शेंगा लागण्याच्या वेळी आढळल्यास. या किडीच्या अळ्या सुरुवातीला पानांवर समूहाने राहतात. अशी पाने त्याचवेळी तोडून नष्ट करावीत. या किडीचे नर पतंग आकर्षित करण्यासाठी एकरी चार कामगंध सापळे लावावेत.



» रासायनिक नियंत्रण : स्पिनेटोरॅम (११.७% एस. सी.) ४५० मि. लि. प्रती हेक्टर किंवा क्लोरॲण्ट्रानिलीप्रोल (२० एस. सी.) १०० मि. लि. प्रती हेक्टर.



## खोडमाशी

» खोडमाशी ही प्रौढ माशी घरमाशी सारखी. मात्र आकाराने लहान (फक्त २ मि. मी.) व चमकदार काळ्या रंगाची असते. प्रौढ मादीमाशी झाडाच्या देठावर व पानावर पिवळसर रंगाची अंडी घालते. अंड्यातून २-५ दिवसांनी पाय नसलेली अळी बाहेर पडते. त्या अळीचा रंग पांढरा असतो. अळी बाहेर पडताच ती पानाच्या देठात शिरकाव करते. आतील भाग पोखरून खाते. या किडीचा प्रादुर्भाव रोपावस्थेत झाल्यास रोपांच्या संख्येत घट होते. तीव्र प्रादुर्भावामुळे दुबार पेरणीची वेळ येते. अन्यथा उत्पादनात मोठी घट होते.

» नुकसानीचा प्रकार अन् जीवनक्रम : उगवणीपासून ७-१० दिवसापर्यंत या किडीचा प्रादुर्भाव अधिक दिसून येतो. प्रादुर्भावामुळे रोपे पिवळी पडतात, सुकतात आणि मरून जातात. पिकांच्या नंतरच्या अवस्थेत खोडमाशीचा प्रादुर्भाव झाल्यास पिके पिवळी पडत नाहीत. मात्र, शेंगांच्या संख्येत घट होते. दाणे व वजन कमी भरते. उत्पादनात घट होते. या किडीचा जीवनक्रम १०-११ दिवसांत पूर्ण होतो. त्याअगोदर सोयाबीनच्या झाडाला पाडलेल्या छिद्रामध्ये कोषात जाते. थोड्या दिवसानंतर कोषातून प्रौढ माशी बाहेर पडते. आपला जीवनचक्र सुरू करते.

» रासायनिक नियंत्रण (फवारणी प्रती लीटर पाणी) इथिऑन (५० इ. सी.) ३ मि. लि. किंवा इन्डोक्झाकार्ब (१५.८ इ. सी.) ०.६६६ मि. लि. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (४.९ सी. एस.) ०.६ मि. लि.

## चक्री भुंगा



» चक्री भुंगा प्रौढ किड ही नारंगी रंगाची असून, पंखांच्या खालील भाग काळा असतो. अँटेना शरीराच्या लांबीइतक्याच व मागच्या बाजूला वळलेल्या असतात. भुंगे गर्द भुरकट काळ्या पंखांमुळे लगेच ओळखता येतात. पूर्ण विकसित अळी ही २ सें. मी. लांबीची असते. या किडीची अळी पाय विरहित व पिवळ्या रंगाची असते.

» नुकसानीचा प्रकार अन् जीवनक्रम : यात मादी तीन छिद्रे करते. एकामध्ये ती अंडी घालते. किडीचा मादी भुंगा पानाच्या देठावर, फांदीवर किंवा खोडावर दोन चक्राकार भाग तयार करते. थोड्या दिवसानंतर अळी अंड्यातून बाहेर निघून पानाच्या देठात शिरते. आतील भाग खाऊन झाड पोकळ बनवते. अळी १९-२२ मि. मी. लांब गुळगुळीत पिवळसर रंगाची असते.

» नियंत्रण : आर्थिक नुकसानीची पातळी फुलोऱ्यापूर्वी ३-५ चक्रीभुंगे प्रति ओळीत आढळल्यास. फवारणी प्रती लीटर पाणी. प्रोफेनोफॉस (५० इ. सी.) २ मि. लि. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (९.५० झेडसी) ०. २५ मि. लि.

# कपाशीवरील रसशोषक किडींचे व्यवस्थापन



» मावा : ही कीड रंगाने पिवळसर किंवा फिकट हिरवी आणि आकाराने अंडाकृती असते. मावा व त्याची पिल्ले पानाच्या खालच्या बाजूने आणि कोवळ्या शेंड्यावर समुहाने राहून रस शोषतात. अशी पाने निस्तेज होऊन आक्रसतात, खालील बाजूला मुरगळलेली दिसतात. त्यामुळे झाडाची वाढ खुंटते. मावा किडीच्या शरीरातून स्त्रवणाऱ्या गोड चिकट द्रवामुळे पाने चिकट बनतात. कालांतराने त्यावर काळी बुरशी वाढून, पानाच्या अन्न निर्मिती प्रक्रियेत अडथळा निर्माण होतात.

» पांढरी माशी : प्रौढ माशी आकाराने लहान शरीरावर पिवळसर झाक असून पंख पांढरे असतात. डोक्यावर दोन तांबडे ठिपके असतात. प्रौढ व पिल्ले पानाच्या खालील बाजूला राहून रस शोषतात. अशी पाने कोमेजतात. अधिक प्रादुर्भावामध्ये पाने लालसर ठिसूळ होऊन शेवटी वाळतात. पिल्लांच्या शरीरातून स्त्रवणाऱ्या गोड चिकट द्रवामुळे पानावर काळी बुरशी वाढते. तसेच पांढरी माशी रोगाचा प्रसार करते. या किडीचा प्रादुर्भाव कोरडवाहू कपाशीवर सप्टेंबर महिन्यापासून सुरू होतो. नोव्हेंबर महिन्यात अधिक प्रादुर्भाव दिसून येतो.

» तुडतुडे : प्रौढ व पिल्ले फिकट हिरवे, पाचरी प्रमाणे असतात. समोरच्या पंखावर एक काळा ठिपका असतो. तुडतुड्यांच्या पिल्लांना पंख नसतात. तुडतुड्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते तिरके चालत चटकन उडी मारतात. प्रौढ व पिल्ले पानाच्या खालील बाजूला राहून रस शोषतात. त्यामुळे पाने प्रथम बाजूने पिवळसर होऊन नंतर तपकिरी होतात. अधिक प्रादुर्भावामध्ये संपूर्ण पाने लाल तांबडी, त्यांच्या कडा मुरगळलेली दिसतात. परिणामी झाडांची वाढ खुंटते. अशा झाडांना पाते, फुले आणि बोंडे कमी प्रमाणात लागतात.

### आर्थिक नुकसान पातळी

- » १० मावा प्रति पान
- » ८ ते १० प्रौढ पांढरी माशी किंवा २० पिल्ले प्रति पान
- » २ ते ३ तुडतुडे प्रति पान
- » आढळून आल्यानंतर रासायनिक कीटकनाशकाचा वापर करावा. त्यापूर्वी एकात्मिक नियंत्रण पद्धतीचा अवलंब करत राहावा.

### व्यवस्थापन

वेळोवेळी प्रादुर्भावग्रस्त फांद्या, पाने व इतर पालापाचोळा जमा करून नष्ट करावा. खुरपणी, कोळपणी करून पीक ताणविरहित ठेवावे. माती परिक्षणानुसार नत्र खतांचा योग्य प्रमाणात वापर करावा. त्यामुळे कपाशीची अनावश्यक कायिक वाढ होणार नाही. अशा पिकावर कीड कमी प्रमाणात राहील. निसर्गतः रसशोषक किडीवर उपजीविका करणारे मित्र कीटक उदा. ढालकीटक, सिरफिड माशी, क्रायसोपा, ॲनसियस असे परोपजीवी कीटक आढळून आल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा. मित्र किटकांचे संवर्धन होईल. पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे लावावेत. पीक वाढीच्या सुरुवातीपासून निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा ॲझाडिरॅक्टीन (१००० पीपीएम) २ ते ३ मि.लि. प्रति लिटर या प्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

### रासायनिक किटकनाशक फवारणी

किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यास पुढीलपैकी कोणत्याही एका रासायनिक कीटकनाशकाची फवारणी करावी. (प्रमाण : प्रति लिटर पाणी) फ्लोनिकॅमिड (५० टक्के डब्ल्यूजी) ०.३ ग्रॅम किंवा थायामेथोक्झाम (२५ टक्के डब्ल्यूजी) ०.२ ग्रॅम किंवा ब्युप्रोफेजीन (२५ टक्के एससी) २ मिलि किंवा फिप्रोनील (५ टक्के एससी) ३ मिलि किंवा डायफेन्थुरॉन (५० टक्के डब्ल्युपी) १.२ ग्रॅम किंवा ॲसीफेट (५० टक्के) अधिक इमिडाक्लोप्रीड (१.८ एसपी) (संयुक्त कीटकनाशक) २ ग्रॅम. विशेषतः फूल किडीच्या व्यवस्थापनाकरिता फिप्रोनिल (५ टक्के एससी) ३ मिलि किंवा स्पिनेटोरम (११.७ टक्के एससी) ०.८४ मिलि. टीप : फवारणीसाठी शुद्ध पाणी वापरावे. शेतात कीटकनाशकांचे द्रावण तयार करताना व फवारणी करताना चष्मा, हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा. फवारणीसाठीच्या मात्रा हाय व्हॉल्यूम पंपासाठीच्या आहेत.

# हरभरा कीड, रोग नियंत्रण !

## घाटेअळी

» घाटेअळी ही अमेरीकन बोंड अळी, हिरवी बोंड अळी, हरभऱ्यावरील घाटे अळी व तुरीवरील शेंगा पोखरणारी अळी अशा विविध नावांनी ओळखली जाते. पूर्ण विकसित घाटे अळी पोपटी रंगाची (यात विविध रंगछटा सुद्धा आढळतात) व शरीराच्या बाजूवर तुटक करड्या रेषा आढळतात.

» नुकसान : लहान अळ्या सुरुवातीस पानावरील आवरण खरडून खातात. अशी पाने काही अंशी जाळीदार व भुरकट पांढरी पडलेली दिसतात. विकसित घाटे अळी कळ्या व फुले कुरतडून खातात. पूर्ण वाढ झालेली अवस्था तोंडाकडील भाग घाट्यात घालून आतील दाणे फस्त करते.



» घाटेअळीचे एकात्मिक नियंत्रण : उन्हाळ्यात जमिनीची नांगरणी करावी. त्यामुळे किडींचे कोष पक्षी वेचून खातात, तसेच उन्हामुळे मरतात. वाणनिहाय शिफारशीत अंतरावर पेरणी करावी. घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी सापळ्यामध्ये ल्युरचा वापर करावा. शेतात हेक्टरी ५ सापळे पिकापेक्षा एक फुट उंचीवर लावावेत. पतंगाची संख्या सतत ३ दिवस आर्थिक नुकसान मर्यादेपेक्षा जास्त (८-१० प्रती सापळा) आढळल्यास त्वरित उपाययोजना करावी. शेतात दरहेक्टरी २० पक्षीथांबे उभारावेत. पक्ष्यांमुळे अळ्यांची संख्या कमी होण्यास मदत होते. घाटे अळीने आर्थिक नुकसानीची पातळी (१-२ अळ्या प्रती मीटर ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास व्यवस्थापन उपाययोजना करावी.

» वनस्पतिजन्य कीटकनाशके : सुरुवातीच्या काळात ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी फायदेशीर आढळली आहे.

» जैविक व्यवस्थापन : घाटे अळीच्या प्रभावी नियंत्रणासाठी एच.ए.एन.पी.व्ही विषाणूजन्य कीटकनाशकाचा वापर शिफारसीनुसार करावा. प्रथम व द्वितीय अवस्थेतील अळ्यांचे नियंत्रण करावे.

» रासायनिक नियंत्रण : हरभऱ्यावरील घाटे अळीच्या आर्थिक नुकसानीच्या संकेत पातळीवरील प्रभावी व्यवस्थापनासाठी क्लोरअँट्रानिलीप्रोल (२० एससी) २.५ मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट (५ टक्के पाण्यात मिसळणारे दाणेदार) ३ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## गोनोसेफॅलम भुंगा



» भुंग्याचा रंग काळपट, भुरकट असतो. किडीची मादी जमिनीत अंडी घालते. अळी अवस्था जमिनीत राहते. प्रौढ जमिनीच्या वरच्या थरात फटीत राहतात. भुंगे दिवसा सहसासहजी दिसत नाहीत. प्रौढ भुंगे जमिनीत राहून बियांचा अंकुर खातात. उगवण झालेली रोपे जमिनीलगत कापून पडल्याप्रमाणे दिसतात.

» नियंत्रण : प्रतिकिलो बियाण्यास २ ग्रॅम क्लोथियानिडीन (५० डब्ल्यूडीजी) प्रक्रिया करावी. पेरणीच्या वेळी फोरेट (१० जी) १० किलो प्रतिहेक्टरी जमिनीत मिसळावे. पीक उगवणीनंतर २० दिवसांनी क्लोरपायरिफॉस (२० इसी) २० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

» लष्करी अळी (स्पोडोप्टेरा) : प्रौढ पतंग मध्यम आकाराचा असतो. अंडी फिकट रंगाची गोलाकार असतात. अंडी पानावर किंवा फांदीवर सरासरी १५० च्या समूहामध्ये दिली जातात. अळी पानावर आणि घाट्यावर प्रादुर्भाव करते.

» रोप कुरतडणारी अळी (कटवर्म) : अळी दिवसा जमिनीत लपते. रात्रीच्या वेळी लहान रोप जमिनीलगत कापते.

» पाने पोखरणारी अळी : प्रौढ पतंग चकाकणारे, गडद रंगाचे असतात. मादी पानावर अंडी घालते. अळी पिवळ्या रंगाची असते. अळी पानामध्ये शिरून आतील हरितद्रव्य खाते. यामुळे पानाच्या वरच्या बाजूस नागमोडी आकाराच्या रेषा दिसतात. प्रादुर्भाव दिसताच डायमेथोएट (३० टक्के प्रवाही) १० मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

» मावा : प्रौढावस्था ही चमकदार काळ्या रंगाची असते. बऱ्याच वेळा पंखधारी असते. फांद्या, फुले शेंगावर कीड वसाहत करून राहते. प्रादुर्भाव झालेल्या रोपाची पाने आकसतात. अशावेळी पाण्याचा ताण पडल्यास रोपे वाळतात. हरभऱ्यावरील स्टंट रोगाचा प्रसार या किडीमुळे होतो.

» मर : हा रोग फ्युजारियम ऑक्सिस्पोरम बुरशीमुळे होतो. प्रादुर्भावग्रस्त रोपांची कोवळी पाने आणि फांद्या सुकतात. शेवटी संपूर्ण झाड वाळते. मर रोग प्रतिकारक जातीची लागवड करावी. (उदा : जॅकी-९२१८, विजय, आयसीसीव्ही-१०, विशाल, विराट). ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रतिकिलो बियाण्यास प्रक्रिया करावी.

» कोरडी मूळकूज : रोगाचा प्रादुर्भाव रायझोक्टोनिया बटाटीकोला बुरशीमुळे होतो. रोगग्रस्त रोपांची वरील पाने व देठ पिवळा पडून झुकतात. त्यानंतर पाने गवती रंगाची होतात. मुळे सडतात. रोपे उपटली असता सहज निघून येतात.

» ओली मूळकूज : रोगाचा प्रादुर्भाव फ्युजेरियम सोलेनी बुरशीमुळे होतो. रोपे बुटकी होतात. पाने पिवळी पडून वाढ खुंटते. रोप उपटून पाहिल्यास मुळे कुजलेली दिसतात. सालीवर बुरशीची काळसर वाढ दिसून येते.

» थायरम ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. रोगग्रस्त झाडांचे अवशेष नष्ट करावेत.

# एसआयआर नंतर मतदार यादीतून नाव हटलं तरी नागरिकत्व रद्द होत नाही -सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**-विशेष सघन पुनरिक्षण प्रक्रियेनंतर एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तरी त्यामुळे त्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येत नाही, असे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. नागरिकत्वाचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नसून तो कायद्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडेच असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

१३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयाने घटनात्मक अधिकार, निवडणूक प्रक्रिया, नागरिकत्व, मालमत्ता, वारसा, खाणकाम आणि करार कायद्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. या निकालांमधून विविध कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत न्यायालयाने स्पष्ट भूमिका मांडली आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रक्रियेनंतर मतदार यादीतून नाव वगळले जाणे आणि नागरिकत्व गमावणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत नसल्याने तो भारतीय नागरिक नाही, असा निष्कर्ष काढता येणार नाही. नागरिकत्वाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. याचवेळी डखठ प्रक्रियेनंतर नाव वगळलेल्या नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या अपील प्रक्रियेबाबत दाखल याचिकेवरही न्यायालयात सुनावणी झाली.

भारतीय राज्यघटनेच्या कलम २२६ अंतर्गत अधिकार वापरताना उच्च न्यायालयांना कनिष्ठ न्यायालयांनी नोंदवलेल्या पुराव्यांचे पुन्हा मूल्यमापन करता येणार नाही किंवा वस्तुस्थितीवरील निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने म्हटले की, कलम २२६ अंतर्गत हायकोर्टाची भूमिका केवळ कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दुरुस्त करण्यापुरती मर्यादित आहे. त्यामुळे हायकोर्ट अपील न्यायालयाप्रमाणे संपूर्ण प्रकरणाची नव्याने सुनावणी घेऊ शकत नाही. या निरीक्षणासह कर्नाटक उच्च न्यायालयाचा संबंधित निर्णय रद्द करण्यात आला.

# हवामान विभागाच्या इशाऱ्यामुळे अमरनाथ व माता वैष्णो देवी यात्रा स्थगित

**मुंबई (प्रतिनिधी)** - हवामान विभागाने दिलेल्या तीव्र हवामानाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने श्री अमरनाथ आणि श्री माता वैष्णो देवी यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. मात्र, शनिवारी श्री अमरनाथ यात्रा सुरूच राहिली, ज्यात १६,०३९ भाविकांनी पवित्र गुहा मंदिराला भेट दिली. यामुळे ३ जुलै रोजी यात्रा सुरू झाल्यापासून आतापर्यंत एकूण भाविकांची संख्या ३,७६,७७९ झाली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, शनिवारी पूजा करणाऱ्यांमध्ये





११,७८५ पुरुष भाविक, ३,५२७ महिला भाविक, २३५ मुले, १०३ साधू, १९ साध्वी, पाच तृतीयपंथी भक्त आणि ३६५ सुरक्षा कर्मचाऱ्यांचा समावेश होता. दरम्यान, ३,६३२ यात्रेकरूंची १७ वी तुकडी शनिवारी पहाटे जम्मू येथील भगवती नगर यात्री निवास येथून कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत रवाना होऊन काश्मीरमध्ये दाखल झाली.

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) खराब हवामानाचा इशारा दिल्यानंतर, प्रशासनाने रविवार, १९ जुलैपासून पहलगाम आणि बाल्टाल या दोन्ही मार्गांवरील अमरनाथ यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. एका अधिकृत निवेदनानुसार, यात्रेकरूंची सुरक्षितता आणि कल्याण लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, पुढील काही दिवसांत अपेक्षित असलेल्या खराब हवामानाच्या पार्श्वभूमीवर आणि यात्रेकरूंच्या सुरक्षिततेसाठी व कल्याणासाठी, श्री अमरनाथजी यात्रा १९ जुलै, २०२६ पासून पहलगाम आणि बाल्टाल या दोन्ही मार्गांवरून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे.

काश्मीरचे विभागीय आयुक्त अंशुल गर्ग यांनी सांगितले की, रविवारपासून बाल्टाल आणि नुनवान/चंदनवारी बेस कॅम्पमधून यात्रेकरूंना पुढे जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. प्रशासनाने सांगितले आहे की, हवामानाच्या परिस्थितीचा सखोल आढावा घेतल्यानंतर आणि दोन्ही मार्ग यात्रेकरूंसाठी सुरक्षित असल्याची खात्री झाल्यावरच यात्रा पुन्हा सुरू केली जाईल. प्रशासनाने सांगितले आहे की, हवामानाच्या परिस्थितीचा सखोल आढावा घेतल्यानंतर आणि दोन्ही मार्ग यात्रेकरूंसाठी सुरक्षित असल्याची खात्री झाल्यावरच यात्रा पुन्हा सुरू केली जाईल. यात्रा पुन्हा सुरू करण्याबाबतची अद्ययावत माहिती योग्य वेळी दिली जाईल. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या तीव्र हवामानाच्या इशाऱ्यानंतर, यात्रेकरूंची सुरक्षितता आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून श्री माता वैष्णो देवी यात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. या भागातील तीव्र हवामानाच्या अंदाजानंतर जनहित आणि सुरक्षिततेच्या विचाराने हा निर्णय घेण्यात आला आहे. भाविकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचा आणि पुढील सूचना मिळेपर्यंत यात्रा न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. यात्रा पुन्हा सुरू करण्याबाबतच्या ताज्या माहितीसाठी यात्रेकरूंना अधिकृत माध्यमांच्या संपर्कात राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

# पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत; मुंबई-बेंगळुरू अंतर पाच तासांत



**पुणे(प्रतिनिधी)**-पुणे ते संभाजीनगर प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी नवीन उन्नत मार्ग उभारण्यात येणार असून, या प्रकल्पामुळे हे अंतर अवघ्या दोन तासांत पार करता येणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. पुण्यात विविध रस्ते व पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी गडकरी बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून सुमारे ५० हजार कोटी रुपयांच्या कामांना लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुणे-संभाजीनगर मार्गावरील प्रस्तावित प्रकल्पामुळे पुण्याच्या वाढत्या वाहतूक समस्येवर उपाय मिळणार आहे. शिरूर ते संभाजीनगर या सुमारे १५ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे पुणे-संभाजीनगर प्रवास दोन तासांत शक्य होईल. पुढे संभाजीनगर ते नागपूर प्रवास सुमारे पाच तासांत पूर्ण करता येणार आहे. हा मार्ग पुणे आणि नागपूरला जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गासाठी सुमारे १,२५० कोटी रुपयांचे काम सुरू असून, या मार्गाचे सुशोभीकरण ऐतिहासिक स्वरूपात करण्यात येणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले.

# नागालँडमध्ये दरड कोसळून ८ जणांचा मृत्यू, १२ जखमी; बचावकार्य सुरू

**मोन (वृत्तसंस्था)** -नागालँडमधील मोन जिल्ह्यात रविवारी सकाळी झालेल्या दरड कोसळण्याच्या अनेक भीषण घटनांमध्ये किमान ८ जणांचा मृत्यू झाला असून, १२ जण जखमी झाले आहेत. सततच्या मुसळधार पावसामुळे ही परिस्थिती उद्भवली असून, जिल्हा प्रशासन आणि बचाव पथकांनी शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू ठेवली आहे.

मोन जिल्ह्याचे उपायुक्त वेन्येई कोन्याक यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात रविवारी पहाटे १ वाजेपासून पावसाचा जोर वाढला होता. त्यानंतर सकाळी ६ ते ७ च्या सुमारास विविध ठिकाणी दरडी कोसळल्याच्या बातम्या मिळाल्या. मोन शहर आणि तिझित हे भाग या दुर्घटनेत सर्वाधिक बाधित झाले आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांपैकी आतापर्यंत ४ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, इतर ४ जणांचा शोध सुरू आहे. यामध्ये ३ महिला आणि १ पुरुषाचा समावेश आहे. सध्या एसडीआरएफ, पोलीस, आसाम रायफल्स, एनडीआरएफ आणि स्थानिक नागरिक मिळून बचावकार्य करत आहेत. दरड कोसळल्यामुळे अनेक घरांचे मोठे नुकसान झाले असून,



रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

भारतीय जनता पक्षाचे नागालँड प्रदेशाध्यक्ष बेंजामिन येपथॉमी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी मृतांच्या नातेवाईकांप्रती संवेदना व्यक्त करत जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली. तसेच, बचाव पथके, जिल्हा प्रशासन, वैद्यकीय कर्मचारी आणि स्वयंसेवक ज्या पद्धतीने या कठीण काळात सेवा देत आहेत, त्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.नागालँडमध्ये केवळ मोनच नाही, तर मोकोकचुंग जिल्ह्यातील 'तुली' भागातही दरडी कोसळल्यामुळे अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीचा हा फटका नागालँडमधील जनजीवनावर गंभीर परिणाम करणारा ठरला असून, प्रशासन परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे.

# मतदानाचे फॉर्म घेऊन घरी का आला नाहीस म्हणत बीएलओला मारहाण; परळीत ४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल





**बीड(प्रतिनिधी)** -राज्यासह देशभरात सध्या एसआयआर प्रक्रिया राबवली जात आहे. याची जबाबदारी बीएलओ म्हणून शिक्षकांवर देखील देण्यात आली आहे. यामुळे शिक्षकांवर कामाचा प्रचंड ताण आला आहे. या एसआयआर नोंदणी कामाला कंटाळून अनके शिक्षक टाळाटाळ करत असल्याचे प्रकरण देखील आता समोर येऊ लागले आहे. अशातच वर्ध्यात एसआयआरमध्ये हयगय करणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारत निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर दुसरीकडे बीडच्या परळीमध्ये मतदानाचे फॉर्म घेऊन घरी का आला नाहीस म्हणत बीएलओला मारहाण करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. तर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी चार जणांच्या विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**एसआयआरच्या कामात कुचराई भोवली; तीन कर्मचाऱ्यांचे निलंबन**

वर्ध्यात एसआयआरमध्ये कामात हयगय करणाऱ्या तीन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. यात दोन शिक्षक तर एका चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. वर्धा उपविभागात ही कारवाई करण्यात आल्याने शुक्षकांचा रोष वाढला आहे. एकीकडे अधिकाऱ्यांचा दबाव, तर दुसरीकडे राजकीय पक्षाचा देखील ससेमीरा वाढला असल्याची चर्चा आता कर्मचाऱ्यांच्या वर्तुळात आहे. शिक्षक संघटनांनी आता याचा निषेध करायला सुरुवात केली आहे. शिक्षकांकडून निलंबनाच्या कारवाईचा निषेध केला जात असून कोरोना काळात मिळालेले पुरस्कार परत करण्याचा इशारा प्रहार शिक्षक संघटनेने दिला.

बीडच्या परळीत बीएलओला लाथा बुक्क्यांनी मारहाण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सध्या एसआयआर नोंदणीचा दुसरा टप्पा सुरू असून शहरातील पेठ मोहल्ला येथे असलेल्या शादी खाना कॅम्पमध्ये बीएलओ म्हणून काम करणारे शिक्षक महफूज जाकीर शेख यांना कॅम्पमध्ये येत मतदानाचे फॉर्म घेऊन आमच्या घरी का येत नाही असे म्हणत चौघांकडून चापटा बुक्क्यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली.

इतकंच नाही तर या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हा मागे घेतला नाहीस तर आम्ही बाहेर येऊन तुला बघून घेऊ या भाषेत धमकी दिली. दरम्यान या प्रकरणी शाकीर अहमद शेख,जुनेद शेख, शोएब शेख आणि एक अनोळखी इसम अशा चौघा विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिकचा तपास परळी शहर पोलीस करत आहेत.

# एकनाथ शिंदेंच्या शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुखाला अटक

**मुंबई(प्रतिनिधी)** -नवी मुंबईतील राजकीय वर्तुळातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. भंगार व्यवसाय करणाऱ्या एका व्यावसायिकाकडून तब्बल २ लाख रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख पूजा बनसोडेला तुर्भे एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. खंडणी देण्यास नकार दिल्यामुळे पूजा बनसोडे आणि तिच्या सहकाऱ्यांनी व्यावसायिकाला तसेच त्याच्या दुकानात काम करणाऱ्या कामगाराला बेदम मारहाण व शिवीगाळ केल्याचा गंभीर आरोप आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदारांचे नवी मुंबईतील इंदिरा नगर परिसरात भंगाराचे दुकान आहे. या परिसरात जर दुकान चालवायचे असेल, तर २ लाख रुपयांची खंडणी द्यावी लागेल, अशी धमकी शिंदे गटाच्या उपजिल्हा संघटक पूजा बनसोडेने दिली होती. तक्रारदाराने ही खंडणी देण्यास नकार दिला.

खंडणीचे पैसे देण्यास नकार दिल्याने संतप्त झालेल्या पूजा बनसोडेने तिचे सहकारी रमजान शेख, सरिता सरवदे, नरेंद्र साकवार आणि हुसेन शेख यांना सोबत घेऊन थेट तक्रारदाराच्या दुकानात धाड घातली. यावेळी या सर्वांनी मिळून व्यावसायिक आणि त्यांच्या दुकानात काम करणाऱ्या कामगाराला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली, तसेच अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे.


## पासपोर्ट हरवला आहे

माझा अहेमद खान पि. खत्ताल अहेमद खान या नावाचा पासपोर्ट (पासपोर्ट क्र. Q-274214) दि. 15/6/2026 रोजी कलामंदिर ते बर्कीचौक दरम्यान ऑटो प्रवासात हरवला आहे. ज्यांना कोणाला सापडला असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**-संपर्क पत्ता-**

अहेमद खान पि. खत्ताल अहेमद खान
रा. एनटीसी मील गेट मो. 7887414802

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. भोकर**

**यांचे कार्यालय डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, भोकर**

410 { E-mail arcsbhokar५०@rediffmail.com}

जा.क्र.सहानि/कक्ष-4/ मअक्रेकोऑलि.भोकर /प्रा.म.यादी/प्रसिध्दी२०२६ दिनांक :- १७/०७/ २०२६.

व्यवस्थापन समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन 2026-2031

प्रारुप मतदर यादीचा कार्यक्रम (केवळ सभासदासाठी )

**संस्थेचे नांव :- महेश अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह लि. भोकर ता. भोकर जि. नांदेड**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 सुधारणा 2013 चे कलम 73 कव व त्या खालील नियम 2014 व नियम ६ ते १० मधील तरतुदीनुसार संस्थेची प्रारुप मतदार यादी 25/03/2026 या अर्हता दिनांकावर तयार केली आह. संस्थेचा प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | २०/७/२०२६ | सकाळी ११ वा | **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.** भोकर व सबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप स्विकारणे | २०/७/२०२६ ते २७/७/२०२६ | स.११.०० ते सांय.०५.०० वाजेपर्यंत | **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.** भोकर |
| ३ | प्राप्त हरकतीवर निर्णय देणे | ३/८/२०२६ | **दु.४.०० वा.** | **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.** भोकर |
| ४ | **अंतीम मतदार यादी प्रसिध्द करणे** | **४/८/२०२६** | **सायं.०४.वा** | **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता.** भोकर व सबंधीत संस्थेच्या सुचना फलकावर |

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**
**ता.भोकर जि. नांदेड**

# विद्यापीठांनी शिक्षणासह कौशल्यांचे एकत्रिकरण करणे आवश्यक -राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**पुणे(प्रतिनिधी)**-कृत्रिम बुद्धीमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स, क्वांटम तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा आणि स्वच्छ ऊर्जेमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत बदल घडून येत आहेत. या पार्श्व-भूमीवर विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना केवळ आजच्या नोकऱ्यांसाठीच नाही, तर भविष्यात निर्माण होणाऱ्या संधीसाठी तयार करावे. शिक्षणासोबत कौशल्यांचे एकत्रिकरण अत्यंत महत्त्वाचे असून त्या माध्यमातून रोजगार देणारे पदवीधर निर्माण करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. डिजीआयआय १०० एक्स महाराष्ट्र,पुणे संवादच्या व सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठाच्या (अभिमत विद्यापीठ) सहकार्याने हॉटेल हयात येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, सिम्बायोसिस सोसायटीच्या प्रधान संचालिका आणि सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठाच्या





प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, उच्च शिक्षण विभागाचे अप्पर सचिव, आनंदराव पाटील, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, टाटा प्रोजेक्ट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक रत्नाकर पै, इंडिया अध्यक्ष आणि धोरणात्मक व आंतरराष्ट्रीय सहभागचे उपाध्यक्ष डॉ. अश्विन फर्नांडिस, डिजीआयआय चे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिका हेमंत सहल आदी उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले, विद्यापीठांनी कौशल्य-आधारित अभ्यासक्रम सुरू करावेत आणि विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेला चालना देण्यासाठी या इनक्युबेशन केंद्रांचा लाभ घ्यावा. असे प्रत्येक विद्यापीठ परिसर नाविन्यतेचे केंद्र बनावे, जिथे विद्यार्थी रोजगार शोधणारे नव्हे तर देणारे पदवीधर होतील. रोजगार क्षमतेवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. प्रत्येक पदवीधराने पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वी अर्थपूर्ण कामाचा अनुभव घेणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपले पदवीधर रोजगारक्षम होत नाहीत, तोपर्यंत भारताकडे असलेल्या युवा लोकसंख्येचा आपण पूर्ण फायदा उठवू शकत नाही.

महाराष्ट्राला प्रगल्भ सांस्कृतिक आणि नागरी वारसा लाभला असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले, राज्यात पर्यटनाची प्रचंड क्षमता आहे. वारसा जतन, सांस्कृतिक संवर्धन, पायाभूत सुविधा आणि डिजिटल पोहोच यांचे प्रभावी एकत्रीकरण केले, तर पर्यटन हे रोजगार आणि आर्थिक विकासाचे एक प्रमुख इंजिन बनू शकते. त्यासाठी विद्यापीठे संशोधन, दस्तऐवजीकरण, वारसा व्यवस्थापन, पर्यटन अभ्यास आणि सामुदायिक सहभागाच्या माध्यमातून यामध्ये योगदान देऊ शकतात.

आपल्या पारंपारिक कला, हस्तकला, लोकपरंपरा, स्थानिक खाद्यसंस्कृती, कृषी विविधता यांचे जतन करणे आणि कृषी-पर्यटनाला (ॲग्रो-टूरिझम) चालना देण्यातून हजारो शाश्वत उपजीविका निर्माण होऊ शकतात. लोकभवनने नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या अनेक पारंपारिक कलाप्रकार शोधून त्यांचे जतन करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. हा समृद्ध सांस्कृतिक वारसा सुरक्षित ठेवणे ही भावी पिढ्यांसाठी ही आपली जबाबदारी आहे, असेही त्यांनी सांगितले. विनायक पै यांनी देखील यावेळी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला विविध नामवंत शिक्षण संस्थातील तज्ज्ञ उपस्थित होते.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# नांदेड उत्तरमध्ये दर्जेदार डिजिटल शाळा उभारणार -आ. कल्याणकर

## ♦ संध्याताई फाऊंडेशनच्या रंगभरण स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद; ३५०० विद्यार्थी सहभागी

**नांदेड (प्रतिनिधी)** –इंग्रजी शाळांची फी परवडत नाही, पण मुलांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवे. या हेतूने नांदेड उत्तर मतदार संघातील अनेक शाळा डिजिटल करणार असून, इंग्रजी माध्यमाच्या शाळाही दर्जेदार बनविणार आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन डॉक्टर, इंजिनिअर व इतर उच्चपदस्थ अधिकारी बनावे, असे प्रतिपादन नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी केले.

संध्याताई फाऊंडेशन महाराष्ट्रच्या वतीने जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि. १९ जुलै रोजी नियोजन भवन येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार श्रीजया चव्हाण, महापौर कविता मुळे, आयोजक संध्याताई कल्याणकर, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जि.प.च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने, मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे, नगरसेवक सुहास कल्याणकर, शिवसेनेच्या महिला जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर, पं.स.चे गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, राजाराम सूर्यवंशी, माणिक भोसले, संजय कोठाळे, प्रकाश गिरे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आमदार कल्याणकर म्हणाले, संध्याताई कल्याणकर यांनी राबविलेला चित्रकला



रंगभरण स्पर्धेचा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. नांदेड उत्तर मतदार संघातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारकडून निधीची कमतरता भासू देणार नाही. येणाऱ्या पिढीला शिक्षकांनी चांगले संस्कार दिले पाहिजेत. ग्रामीण भागातील नागरिकांना इंग्रजी शाळांची फी परवडणार नाही, त्यामुळे शासनाकडून निधी उपलब्ध करून नांदेड उत्तर मतदारसंघात डिजिटल शाळा उभारल्या जातील.

मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारी शिक्षकांनी प्रभावीपणे पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संध्याताई कल्याणकर म्हणाल्या, या स्पर्धेत ५० जिल्हा परिषद शाळांनी सहभाग घेतला होता. जवळपास ३५०० विद्यार्थी सहभागी झाले होते. पहिली ते चौथी आणि पाचवी ते आठवी असे दोन गट करून २५० शाळांना बक्षिसे देण्यात आली. तसेच विशेष कार्य करणाऱ्या ५० मुख्याध्यापकांचा गौरव करण्यात आला. मुले मोबाईलपासून दूर झाली पाहिजेत. देशाचे भविष्य मुले आहेत, त्यांच्यासाठी हा उपक्रम राबविला.

आमदार श्रीजया चव्हाण म्हणाल्या, रंगभरण स्पर्धा हा उपक्रम स्तुत्य असून मुलांच्या विकासाला चालना मिळणार आहे. महापौर कविता मुळे म्हणाल्या, मुलांच्या सुप्त गुणांना वाव देणारा हा उपक्रम आहे. शिक्षणासाठी आम्ही सदैव सहकार्य करू. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव म्हणाले, मुलांना शिक्षणाचा ताण देऊ नका. त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रोत्साहन द्या. मोबाईलच्या युगात ताईंनी मुलांच्या हातात ब्रश दिला, ही कौतुकाची बाब आहे. जि.प.च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाने म्हणाल्या, या स्पर्धेतील एक बक्षीस मुलांचे आयुष्य घडवते. मुलांच्या गुणवत्तेला वाव मिळतो. मनपाच्या शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे यांनीही उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी कलाशिक्षक राजाराम सूर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश कासेटवार यांनी केले. या बक्षीस वितरण कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती.

# अर्धापूर-तामसा रोडवर लोणारी नदीच्या पुलावर क्रेनच्या धडकेत एक ठार



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील लोणारी नदीच्या पुलावर साहेबराव केरबा लोणे (वय ५५ वर्षे) रा. लोणी खु. यांना लहानकडून भरधाव वेगात असलेल्या क्रेनने जोरदार धडक दिली. या धडकेत ते जागीच ठार झाले. हा अपघात रविवार, दि. १९ जुलै रोजी दुपारी घडला.

साहेबराव केरबा लोणे हे लोणी खुर्द गावाकडे पायाने येत असताना लहानकडून येणाऱ्या क्रेनने लोणारी नदीच्या पुलावर जोरदार धडक दिल्याने ते जागीच ठार झाले. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांनी पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, जमादार विजय आडे, हेमंत बिचकेवाड यांना घटनास्थळी पाठवून अपघातात मृत्यू झालेले साहेबराव लोणे यांना महामार्ग पोलीस कर्मचारी व सेवक वसंत सिनगारे यांच्या मदतीने महामार्गाच्या रुग्णवाहिकेतून ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी दाखल केले.अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# बाऱ्हाळी बसवेश्वर चौकाजवळील जीवघेणा खड्डा; दुरुस्तीची मागणी

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)**– बाऱ्हाळी, गुंडोपंत, दापका, उदगीर राज्य महामार्गावरील बाऱ्हाळी येथील बसवेश्वर चौकाजवळ रस्त्याच्या कॉर्नरवर मोठा व खोल खड्डा पडला असून, तो वाहनचालकांसाठी जीवघेणा ठरत आहे. पावसामुळे खड्ड्याची खोली लक्षात न आल्याने विशेषतः दुचाकीस्वारांसाठी अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. उताराला खड्डा असल्यामुळे व येथे वाहनांची वर्दळ अधिक असून, वळणावरच हा खड्डा असल्याने अनेक वाहनचालकांना अचानक वाहन वळवावे लागत आहे. त्यामुळे गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्थानिक नागरिकांनी तात्पुरती खबरदारी



म्हणून खड्ड्यात फांद्या टाकून इशारा दिला असला, तरी हा उपाय पुरेसा नाही. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने तत्काळ दखल घेऊन हा खड्डा बुजवावा व कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे. अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने जागे व्हावे, अशी भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# अवैध वाळू वाहतुकीच्या २ टेम्पोसह ७.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत वजिराबाद पोलीस ठाण्यात दि. १८ जुलै रोजी सलग दोन प्रभावी कारवाया करून अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टेम्पो जप्त केले आहेत.

वजिराबाद पोलीस ठाण्यांतर्गत महावीर चौक येथील महादेव मोबाईल शॉपीजवळ दुपारी ३:४० वाजता विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा टाटा कंपनीचा टेम्पो ४०७ क्रमांक एमएच-४३ डी-१०५९ पकडण्यात आला. या प्रकरणी चालक आकाश संजय माने यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम कलम ४७(७), ४७(८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत पोलीस स्टेशन वजिराबाद गु.र.नं. ३७३/२०२६ अंतर्गत शाईन



फंक्शन हॉलसमोर, हसनापूर रोड येथे सायंकाळी ६:३० वाजता विनापरवाना अवैध वाळू वाहतूक करणारा टाटा कंपनीचा टेम्पो ४०७ क्रमांक एमएच-०४-एफजे-३११५ जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक शेख अमजद शेख रहीम व वाहन मालक दिलीप बापुराव माने यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही कारवायांमध्ये २ टाटा कंपनीचे टेम्पो ४०७ (७ लाख) अंदाजे २.५ ब्रास वाळू (७ हजार) असा एकूण सात लाख सात हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे व सोबत डी. बी. पथकातील पोहेकॉ शिवसांब मठपती, हबीब चाऊस, विलास कदम, गणेश धुमाळ, गुरुदीप सरदार, भाऊसाहेब राठोड, संतोष पोकळे, संतोष पावडे, ज्वालासिंग बावरी, इम्रान पठाण यांनी केली आहे.

**इकडचं तिकडचं**

# जे आहे त्यातच सुख मानुया...

स्थळ : मोर चौक ते छत्रपती चौक हा मॉर्निंग वॉकचा रस्ता. मनपाने टाकलेल्या सिमेंट बेंचवर चार-पाच रिटायर्ड अधिकाऱ्यांच्या गप्पा सुरू होत्या. मी बाजूच्या बाकड्यावर उगीच रेंगाळत बसलो होतो.

एका गृहस्थाने विचारले, काय चाललंय? सगळं ठिकंय ना? उदास दिसता. गृहस्थ उत्तरले, माझी सून मला सकाळी चहा देताना पदर डोक्यावर घेत नाही! तिसरे गृहस्थ म्हणाले, हात्तिच्यामारी. अहो, माझी सून मला चहाच देत नाही, तुम्ही पदराचं काय घेऊन बसलात? तुमची सून वेळेवर चहा देते यातच सुख माना की!

इतकावेळ अत्यंत शांत असलेले चौथे गृहस्थ म्हणाले की, तुम्ही दोघेही नशीबवान आहात. किमान तुमच्या सुना तुमच्यासोबत तरी राहतात. मुलं, सुना, नातवंडं –सगळे असूनही आम्ही दोघेच इथे राहतो.

तेवढ्यात पेपर घेऊन पाचवे गृहस्थ तिथे अवतरले. गप्पांचा विषय सोनम वांगचूकच्या बातमीकडे वळाला. त्यावर त्या घोळक्यातील सर्वात ज्येष्ठ असलेले गृहस्थ म्हणाले, रास्त मागणी असेल तर सत्याग्रह, उपोषण या हत्यारांची परके इंग्रज सुध्दा संवेदनशीलतेने दखल घ्यायचे राव. अन् हे आम्ही निवडून दिलेले सरकार? सत्तेच्या हव्यासापोटी संवेदना इतक्या बोथट होतील हे माहिती असते तर भगतसिंग फासावर चढलेच नसते.

जगात कुणीच कायमचा आनंदी नसतो, आहे त्या परिस्थितीत आनंदी राहता यायला हवं; आणि आपल्यातीलच सत्तेत बसलेली स्वार्थी माणसं शेवटी फक्त आपलंच भलं बघत असतात –एवढा त्या चर्चेचा सार काढून मी येणाऱ्या सिनियर सिटीझन्सला बाकडे रिकामे करून देऊन किशोरदाचं गाणं गुणगुणत घराकडे निघालो...

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

# मातंग समाजाच्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ब्लॅक पँथर सामाजिक संघटनेच्या वतीने शुक्रवार, १७ जुलै २०२६ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, सिडको-हडको, नवीन नांदेड येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले.

या उपोषणात संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले असून, अंकुश गायकवाड यांनी आमरण उपोषण १८ जुलैपासून सुरू केले आहे. आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत. अनुसूचित जाती आरक्षणाचे अ, ब, क, ड वर्गीकरण तत्काळ करावे, साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करावा, अण्णाभाऊ साठे, क्रांतिवीर लहुजी साळवे तसेच मातंग समाजाचा अपमान करणाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी.

१ ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहीर करावी. उपोषणकर्त्यांनी या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

यावेळी पप्पू गायकवाड, रमेश तालीमकर, शंकर बसवंते, आर. जे. वाघमारे, विठ्ठल घाटे, सुरेश कांबळे, अंबादास मेकाले, आनंदा वाघमारे दापशेडकर, पप्पू कांबळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नायगाव** – भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती तसेच नरसी येथील श्री तुळजाभवानी जिनिंग संस्थेचे चेअरमन श्रावण पाटील भिलवंडे यांचा वाढदिवस रविवार, दि. १९ जुलै रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी भिलवंडे यांची भेट घेऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले.



**नांदेड** – संध्याताई फाऊंडेशन महाराष्ट्र आयोजित रंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा नियोजन भवन येथे पार पडला. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. श्रीजया चव्हाण, महापौर सौ. कविता मुळे, अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, शिवालय उद्योग समूहाच्या अध्यक्षा सौ. संध्याताई बालाजी कल्याणकर, प्रवीण सुरडकर, वंदना फुटाणे, प्रवीणा मांदले, सुहास कल्याणकर, अपर्णा नेरलकर, गणेश बोकारे यांच्यासह विद्यार्थी व पालकांची उपस्थित होती. (छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)

## पाणंद रस्ते योजनेच्या सहअध्यक्षपदी बाबुराव केंद्रे

**किनवट (प्रतिनिधी)**– किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रातील बाबुराव केंद्रे यांच्यावर एकाच वेळी दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.



विमुक्त, घुमंतू जनजाती विकास परिषद (अखिल भारतीय) यांच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर त्यांची महाराष्ट्र प्रदेश सहकार्यवाह म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, त्याचबरोबर 'मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना' अंतर्गत किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीच्या सहअध्यक्षपदी देखील त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# जुना मोंढ्यातील लूटप्रकरणी २ आरोपी ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– जुना मोंढा परिसरात झालेल्या लुटमारीचा गुन्हा वजिराबाद गुन्हे शोध पथकाने अवघ्या काही तासांत उघडकीस आणला. या प्रकरणी २ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

दि. १८ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजता फिर्यादी वाजीद अली अहमद अली वय ३० वर्षे, रा. कांदा मार्केट, गाडेगाव, नांदेड हे जुनामोंढा ऑटोस्टॉप परिसरात सामान खरेदीसाठी पायी जात होते. यावेळी मोटारसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याशी झटापट करून शर्टच्या वरच्या खिशातील १,७०० जबरदस्तीने काढून घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाले.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांना तात्काळ घटनास्थळी रवाना करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यावरून वजिराबाद गुन्हे



शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे व त्यांच्या पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

तपासादरम्यान रणजोत्सिंग उर्फ बच्चूसिंग सतनामसिंग बावरी वय २३ वर्षे, रा. भवानीनगर, सिडको, नांदेड, सय्यद सलमान सय्यद बाबूमिया वय २४ वर्षे, रा. एनडी-४१, सिडको, नांदेड या दोघांना अटक केली आहे. सखोल चौकशीत दोघांनीही सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून लुटीची रक्कम हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच गुन्हा करताना वापरलेली मोटारसायकल चोरीची असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून ती पुराव्यासाठी जप्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४) लूट व ३(५) संयुक्त जबाबदारी अन्वये नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील बुलंगे हे करीत

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com